


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२१ ■ बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# भूमि अभिलेख विभागाला 'दणका' 10 कर्मचाऱ्यांना नोटीस....!

## धुळ्यात गुन्हे दाखल झालेल्या पंकज पवार यांच्यासह अकोल्यातील कर्मचारी आता अडचणी

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला:** भूमि अभिलेख विभागात सध्या मोठ्या कारवाईचे वारे वाहत आहेत. प्रशासकीय अनियमिततेचा ठपका ठेवत १० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना 'कारण दाखवा' नोटीस बजावण्यात आल्याने शासकीय यंत्रणेत मोठी खळबळ उडाली आहे. 'आर आर सी न्यूज' आणि 'सिटी न्यूज सुपरफास्ट' ने भूमि अभिलेख विभागातील लावून धरलेल्या बातम्यांचा हा मोठा इम्पॅक्ट मानला जात आहे. निलंबित उपअधीक्षक पंकज पवार यांच्या कार्यकाळात अकोल्यात मालमत्ता पत्रक , मोजणी आणि वारसा नोंदीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. प्रॉपर्टी कार्डमध्ये नियमबाह्य फेरफार झाल्याचा संशय असून, यामध्ये मोठे आर्थिक हितसंबंध गुंतल्याची चर्चा आहे.

### मौखिक आदेश विभागाला अडचणीत आणणार

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या केवळ 'मौखिक' आदेशावरून कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी केलेल्या सह्या आता त्यांच्याच अंगाशी येण्याची शक्यता आहे. मालमत्ता पत्रकात क्षेत्र दुरुस्तीचे किती मॅटर बोगस आहेत ? याचा आकडा समोर येणे अद्याप बाकी आहे. नियमबाह्य मोजणी आणि वारसा हक्काच्या नोंदीमध्ये नेमकी कोणाला झुकते माप देण्यात आले, याची चौकशी पूर्ण झाल्यास अनेकांच्या अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दलालांना हाताशी धरत नियमबाह्य फाईल्स मंजुरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या अडचणी वाढणार असल्याची माहिती समोर आली आहे.




### ते १० अधिकारी आणि कर्मचारी कोण?

जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या निर्देशानुसार ज्या १० जणांना नोटिसा देण्यात आल्या आहेत, त्यामध्ये तत्कालीन शिरस्तेदार, भूमापन विभागाचे कर्मचारी आणि लेखा विभागातील व्यक्तींचा समावेश आहे. वरिष्ठ स्तरावरून चौकशीचा ससेमिरा आता कनिष्ठ कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचला असून, 'वरिष्ठांवर कारवाई केव्हा होणार?' असा प्रश्नही आता उपस्थित केला जात आहे. भूमि अभिलेख विभागाच्या अमरावती विभागाचे उपसंचालक यांनी या विषयीचा आदेश काढला असून यात तत्कालिन उप अधीक्षक भूमि अभिलेख पंकज पवार, तत्कालिन न.प.भू सागर मांडवगडे, शिरस्तेदार राजेश काळे, तत्कालिन न.प.भू नितीन पारधी, स.न.प.भू. सचिन कोलते, न.प.भू राजेश शेगोकार, स.न.प.भू गजेंद्र चव्हाण, तत्कालिन स.न.प.भू विवेक भरक्षे, न.प.भू. कुणाल राजपुत, न.प.भू प्रमोट रंगारे यांच्या नावाने कारणे दाखवा



पंकज पवार वर धुळ्यात गुन्हा दाखल, अकोल्यात टाळाटाळ !

अकोला तपासाचा अहवाल गुलदस्त्यात टाकला कोणी

प्रतिनिधी १३ फेब्रुवारी

धुळे / अकोला: धुळ्यातील जिल्हाधिकारी यांचे क्षेत्र दुरुस्तीचे आदेश प्राप्त नसतानाही, आपल्या अधिकारांचा गैरवापर करून ६८२ प्रकरणांत नियमबाह्य बदल केल्याप्रकरणी धुळ्याचे तत्कालीन भूमी अभिलेख उपअधीक्षक पंकज पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे शहर पोलीस ठाण्यात जिल्हा अधीक्षक विजयकुमार सवडदकर यांनी यासंदर्भात फिर्याद दिली असून, या कारवाईमुळे भूमी अभिलेख विभागातील खळबळजनक गैरव्यवहार चव्हाट्यावर आला आहे.

पदाचा गैरवापर करत पंकज पवार यांनी धुळे येथे कार्यरत असताना, जून २०१६ ते जुलै २०२१ या कालावधीत धुळ्याचे तत्कालिन नगर भूमापन अधिकारी म्हणून काम करताना ही अनियमितता केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ६८२ प्रकरणांत क्षेत्र दुरुस्ती केली. त्याच बरोबर ९२ प्रकरणांमध्ये 'अ-ब-सत्ता' प्रकाराऐवजी 'अ-सत्ता' प्रकार स्वधिकारात दाखल केला. इतक्यावरच पंकज पवार थांबले नाहीत. तर त्यांनी मिळकत पत्रकातील घोळ केला. २७ प्रकरणांमध्ये नवीन नगर भूमापन क्रमांक देऊन खोटी मिळकत पत्रिका तयार केली. अशा एकूण ८०१ मालमत्ता पत्रकांमध्ये अनियमितता करून शासनाची मोठी फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

अकोल्यातील चौकशी अहवाल दाबला कोणी ?

धुळ्यातील घोटाळ्याच्या निलंबनानंतर पंकज पवार यांची अकोल्यात बदली करण्यात आली. अकोल्यातही त्यांनी अनियमितता केली म्हणून त्यांचे पुन्हा निलंबन करण्यात आले. या निलंबन कारवाईनंतर अकोला भूमि अभिलेख कार्यालयात चौकशी समिती दाखल झाली. चौकशी समितीला अनेक प्रकरणात गैरप्रकार आढळला. तसा अहवाल तयार केला गेल्याची माहिती असून पण, हा अहवालच दाबण्यात आला आहे. हा अहवाल का दाबला गेला आणि या सर्व गैरप्रकारात पंकज पवार याच्या सोबत इतर ज्युनिअर अधिकारी व कर्मचारी यांचा देखील सहभाग असल्याचे उघड झाले. असे असताना केवळ पंकज पवार याच्यावर निलंबनाची कारवाई अकोल्यात केल्या गेली. इतरांना कोणी व का वाचविले असा प्रश्न निर्माण होत आहे. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख व उपसंचालक यांनी अकोल्यात कारवाईस टाळाटाळ का केली याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात रंगली आहे.

### पंकज पवारांवर गुन्हे दाखल होण्याची प्रक्रिया

तत्कालीन उपअधीक्षक पंकज पवार यांच्यावर यापूर्वीच धुळे येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आता अकोल्यातील चौकशी अहवालाच्या आधारे त्यांच्यावर स्थानिक पातळीवरही फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया या सर्व प्रक्रियेनंतर होईल काय अशी विचारणा होत आहे. त्याच बरोबर पंकज पवार यांना नियमबाह्य फाईल्स मंजुरी करण्यासाठी ज्या ज्युनिअर आणि सिनिअर अधिकाऱ्यांनी मदत केली त्यांच्यावर देखील धुळ्या प्रमाणे अकोल्यात गुन्हे दाखल झाल्यास मोठा धक्का मानला जाईल.

# अजितदादांचे विमान मुद्दाम आदळले अन् मोठा स्फोट घडवला !

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**मुंबई:** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत विविध तर्क-वितर्क लढवले जात असताना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज पुन्हा एकदा खळबळजनक आरोप केले आहेत. अजित पवार यांच्या घातपाताबाबत आम्हाला जो संशय

### रोहित पवार यांचा दावा

होता तो आता खरा ठरताना दिसत असून त्यांचं विमान पायलटकडून मुद्दा खाली आदळण्यात आले आणि जास्त इंधन भरून मोठा स्फोट घडवून आणला, असा दावा करत रोहित पवार यांनी खळबळ उडवून दिली आहे. रोहित पवार यांनी आज बुधवारी प्रसारमाध्यमांशी संवाद साधत म्हटलं की, 'अजितदादांच्या विमानाचा इतका मोठा स्फोट का झाला? याबाबतीत आम्ही शंका उपस्थित केली होती ती आता खरी ठरत आहे. या विमानात अधिकचे इंधन टँक होते. हे इंधन टँक कुठे असते तर जिथे विमानात शेवटच्या भागात टॉयलेट असते ते टँक ठेवण्याची जागा असते. त्याच्या मागच्याच भागात ब्लॅक बॉक्स असतो.

# दोन दिवसांच्या घसरणीनंतर चांदी ५ हजारांनी महागली !

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**मुंबई:** सोन्या आणि चांदीच्या किमतीत दोन दिवसांच्या घसरणीनंतर आज पुन्हा एकदा वाढ झाली आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंज वर सुरुवातीच्या व्यवहारात चांदीच्या किमतीत ५,००० रुपयांहून अधिक वाढ झाली आहे, तर सोनंदेखील १,५०० रुपयांपेक्षा जास्त महाग झाले आहे. ५ मार्चच्या डिलिव्हरीसाठीची चांदी मागील सत्रात २,२८,७८३ रुपये प्रति किलोवर बंद झाली होती, जी आज २,३२,९२९ रुपयांवर उघडली. सुरुवातीच्या व्यवहारात ही चांदी ५,०८७ रुपयांच्या वाढीसह २,३३,८७० रुपयांपर्यंत पोहोचली होती.




शालार्थ आयडी घोटाळा दाबण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागावर एजंटचा ताबा असून थेट बाळापूर च्या क्युबा शाळेतील आसिफ नावाच्या शिक्षक शिक्षण विभागाचे कंप्युटर आणि फाईल हाताळत असून या शिक्षण विभागाच्या वरिष्ठांचे आशिर्वाद असल्याची माहिती आहे. या सर्व घडामोडींची जिल्हा परिषद सीईओ यांनी चौकशी करण्याची गरज आहे.


# आता अकोट ते आमला खु. मार्गाच्या कामावर भर !

## अकोला -खंडवा रेल्वे प्रकल्प; 2027 पर्यंत प्रकल्प होणार पूर्ण

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** दहा राज्यांना परस्पर जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी खंडवा-अकोला-इंदूर-रतलाम-चित्तोडगड-मारवाड रेल्वे प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. आता अकोट ते आमला खुर्द या उर्वरित टप्प्याचे काम पूर्ण करण्यावर भर देण्यात येत असून २०२७ पर्यंत हा संपूर्ण प्रकल्प पूर्ण होणार आहे. त्यादृष्टीने नियोजनबद्ध काम सुरु आहे. तसेच हिवरखेड-तुकाईथड या विभागात भूमी अधिग्रहणासोबतच रेल्वे लाइनचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत सुरू असलेल्या खंडवा-अकोला गेज परिवर्तन प्रकल्पात मध्य प्रदेशातील आमलाखुर्द-तुकाईथड रेल्वे विभागादरम्यान तापी नदीवरील महत्त्वाच्या पुलाचे काम निर्णायक टप्प्यात पोहोचले आहे. या पुलावर प्रत्येकी ७६.२ मीटर लांबीचे चार 'ओपन वेब गर्डर' यशस्वीपणे बसवण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली. खंडवा-अकोला हा मार्ग ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित करण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, तो महाराष्ट्र व मध्य प्रदेश यांना अधिक सक्षम रेल्वे जोडणी देणार आहे. त्यामुळे उत्तर भारताचा दक्षिणेशी कमी अंतराचा प्रवास होणार आहे. विद्यमान मीटरगेज मार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाल्यानंतर प्रवासी गाड्यांची गती वाढणार असून, मालवाहतुकीची क्षमतादेखील लक्षणीयरीत्या सुधारेल, औद्योगिक, कृषी व व्यापारी दृष्टीने हा मार्ग महत्त्वाचा ठरणार आहे.



### जवळपास दहा राज्यांना मिळणार थेट जोडणी

ही रेल्वे लाइन पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र, मध्य प्रदेश, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, पंजाब तसेच दिल्ली आणि दक्षिण भारताशी थेट रेल्वे जोडणी सुलभ होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने कामाला गती दिली आहे. यासाठी तत्कालीन खासदार संजय धोत्रे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता तर आता खा. अनुप धोत्र यांच्या प्रयत्नामुळे कामाला गती मिळत असल्याचे सांगण्यात येत आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विदर्भासह मध्य भारतातील व्यापार, उद्योग व प्रवास व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे.

# अजितदादांच्या निधनादिवशीच मंत्रालयात सह्यांचा सपाटा लावणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर काही तासांतच राज्यातील अल्पसंख्याक विकास विभागातून शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा देणारे प्रमाणपत्र जारी केल्याप्रकरणी अखेर मंगळवारी कारवाई झाली. विभागाचे उपसचिव मिलिंद शेणॉय यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे.

अल्पसंख्याक दर्जा मिळावा यासाठी अर्ज केलेल्या शिक्षण संस्थांची सुनावणी झाल्यानंतर त्यांचे प्रमाणपत्र अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या तसेच दुखवटा काळात दिल्याचे स्पष्ट झाले आहे. याबाबत उपसचिव शेणॉय यांना विभागातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला असून, त्यांना पुढील नियुक्तीसाठी तिष्ठत ठेवले आहे. दरम्यान, याप्रकरणी आणखी कुणाकुणावर कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. अल्पसंख्याक विकास विभागात कार्यासन ५ द्वारे अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्रे दिली जातात. कार्यासन ५ची जबाबदारी उपसचिव मिलिंद शेणॉय यांच्याकडे आहे. शैक्षणिक संस्थांकडून अल्पसंख्याक दर्जा देण्याबाबत प्रस्ताव आल्यानंतर, याविषयी संस्थांची सुनावणी घेण्याचे आणि त्यावर निर्णय घेऊन अंतिमतः प्रमाणपत्र जारी करण्याचे अधिकार शेणॉय यांना आहेत. त्यामुळे याप्रकरणी पहिली कारवाई शेणॉय यांच्यावर झाली आहे.

अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशी आणि दुसऱ्या दिवशी ७५ शाळांना अल्पसंख्याक प्रमाणपत्र दिले गेले. मध्यंतरी बोगस शाळांप्रकरणी एसआयटीने केलेल्या तपासात सहा-सात हजार जणांचा सहभाग असल्याचे उघड झाले होते. त्यापेक्षाही आताचा घोटाळा मोठा आहे. आम्ही याची चौकशी करून मकोका अंतर्गत कारवाई करू, असे महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी स्पष्ट केले.

# मुस्लीम समाजाचे एसईबीसी आरक्षण रद्द ! राज्य सरकारकडून निर्णय जाहीर

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**मुंबई :** राज्यातील मुस्लिम समाजाला देण्यात आलेले 'एसईबीसी' म्हणजे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला वर्ग म्हणून देण्यात आलेले आरक्षण रद्द करण्याचा निर्णय मंगळवारी उशीरा राज्य सरकारने जाहीर केला. या संदर्भातील शासन निर्णय जाहीर करण्यात आहे. या संदर्भात उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये या निर्णयाला स्थगिती दिली होती. त्यानंतर आता न्यायालयाच्या निकालाचा आधार घेऊन, राज्य सरकारने या संदर्भातील शासन निर्णय मंगळवारी रद्द केला. या निर्णयामुळे मुस्लिम समाजात मोठा रोष निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. राज्य सरकारतर्फे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी पाच टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या संदर्भातील शासन निर्णयही जाहीर करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार सरळ सेवांच्या पदभरतीमध्ये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी पाच टक्के आरक्षण देण्यात आले होते. या शासन निर्णयातील निर्देशानुसार अल्पसंख्याक विभागाकडून विशेष मागास प्रवर्ग-अ मधील मुस्लिम समाजास नियमानुसार जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, या निर्णयाच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली होती. संजीत शुक्ला यांनी या संदर्भात २०१४ रोजी न्यायालयात धाव घेतली होती.

अखेर या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने १४ नोव्हेंबर २०१४ रोजी आदेश देऊन, राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील सरळ सेवा प्रवेश नियुक्त्यांमधील पाच टक्के नियुक्त्या विशेष मागास प्रवर्ग-अ करिता राखून ठेवण्याच्या तरतुदीस अंतरिम स्थगिती दिली होती. त्यातच या संदर्भात जाहीर करण्यात आलेल्या अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर न झाल्याने या अध्यादेश व्यपगत झाला आहे, परिणामी या संदर्भात जाहीर केलेले शासन निर्णय/परिपत्रक आपोआप रद्दबातल ठरतात. त्या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भातील आतापर्यंत २०१५ आणि २०१४मध्ये जाहीर झालेला शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे. अल्पसंख्याक कल्याणमंत्री नसीम खान यांनी जुलै २०१४ मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुस्लिम समुदायासाठी पाच टक्के आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता. कोणत्याही चर्चेशिवाय एकमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता.

# नरनाळा महोत्सवाची सुरेल सांगता...!

## पद्मश्री कैलास खेर यांच्या गायनाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध







प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** सुफी संगीत, लोकसंगीतावर महारत असलेले प्रसिद्ध गायक पद्मश्री कैलास खेर यांच्या जादूई सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. गेल्या ३ दिवसांपासून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी ठरलेल्या नरनाळा महोत्सवाचा मंगळवारी रात्री रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीत सुरेल समारोप झाला.

यावेळी आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, माजी आमदार संजय गावंडे, अकोटच्या नगराध्यक्ष माया धुळे, जिल्हाधिकारी वर्षा मीना, यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना, वन क्षेत्र संचालक आदर्श रेड्डी, राहुलसिंह टोलिया उपस्थित होते.

पद्मश्री कैलास खेर यांनी 'तेरी दिवानी', 'तेरे बिन नहीं लगता दिल मेरा', ' जयजयकारा', 'हे री सखी', ' अल्लाह के बंदे' अशी एकाहून एक सरस गाणी सादर केली. अस्सल भारतीय परंपरेचा बाज असलेली गाणी, शब्दरचना व आवाजातील आर्तता रसिकांच्या काळजाला भिडली. प्रत्येक रचनेने दाद मिळवली. 'जोबन छलके' वर महिलांनी व्यासपीठावर येऊन खेर यांच्यासोबत नाचत ताल धरला.

खेर यांनी आपल्या सादरीकरणात सर्वांना सहभागी करून घेतले. प्रारंभी स्थानिक कलावंत श्रीमयी धम्मपाल चिंचोलकर हिने 'लूट गये' हे गाणे गाऊन सर्वांची दाद मिळवली.

अकोट येथील स्थानिक कलावंतांनी देवीचा गोंधळ सादर केला. सकाळच्या सत्रात कविसंमेलन व मुशायरा झाला. विविध स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली.

# दुसरा 'गोधरा' घडण्याची शक्यता! आंबेडकरांचे वक्तव्य

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**मुंबई :** राज्यातील महापालिकांचे विश्लेषण करताना मीडिया मुसलमानांच्या हाती राजकारण जात आहे. आता हिंदूंनी सावध राहावे आणि तलवारी काढून राहावे, असं ध्रुवीकरण करताना दिसत आहे. म्हणून मी म्हणतो, की देशभरामध्ये दुसरा 'गोधरा' घडण्याची शक्यता दिसते,' असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. राज्यातील महापालिकांचे विश्लेषण करताना मीडिया मुसलमानांच्या हाती राजकारण जात आहे.

# मुंबई-नागपूर, नागपूर-पुणे मार्गासाठी ८ विशेष रेल्वेगाड्या !

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**नागपूर :** होळी सणानिमित्त प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. फेब्रुवारी ते मार्चचा पहिला आठवडा या कालावधीत 'ट्रेन ऑन डिमांड' योजनेंतर्गत मुंबई-नागपूर तसेच पुणे-नागपूर मार्गावर आठ विशेष रेल्वेगाड्या धावणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई-नागपूर दरम्यान गाडी क्रमांक ०२१४१/०२१४२ या साप्ताहिक विशेष गाड्या २२ आणि २४ फेब्रुवारी रोजी प्रत्येकी दोन फेऱ्या करतील.

मुंबईहून गाडी ००.२० वाजता सुटून दुपारी १५.१० वाजता नागपूरला पोहोचेल. तर, नागपूरहून सायंकाळी २०.०० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी १३.३० वाजता मुंबईत पोहचेल. या गाड्यांना दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, अकोला, बडनेर, धामनगाव आणि वर्धा या स्थानकांवर थांबे देण्यात आले आहेत. पुणे-नागपूर-पुणे मार्गावरही विशेष गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## शिवजयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे विशेष व्याख्यान आणि भव्य बाईक रॅलीचे आयोजन

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अमरावती:** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अमरावती जिल्हा प्रशासनाच्या वतीने १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी शहरात विविध सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने या सोहळ्याचे आयोजन केले असून, शिवरायांची विचारधारा आणि व्यवस्थापन कौशल्य जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा मानस व्यक्त केला आहे. कार्यक्रमाची सुरुवात बुधवारी, दि. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे होणाऱ्या व्याख्यानाने होईल. यावेळी 'शिवश्री' प्रा. प्रेमकुमार बोके आणि प्रा. डॉ. वैभव मस्के हे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व, त्यांचे शौर्य आणि आजही सुसंगत असलेली त्यांची विचारधारा या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

# मेळघाटात एकाच दिवशी ११२ गावात ३ हजार ६५० जात प्रमाणपत्रांचे वाटप

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अमरावती:** मेळघाटातील दुर्गम भागातील नागरिकांना शासकीय सेवांचा लाभ थेट त्यांच्या दारी मिळावा, या उद्देशाने राबवण्यात आलेल्या विशेष मोहिमेत आज धारणी तालुक्याने नवा इतिहास रचला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज धारणी तालुक्यातील ११२ गावांमध्ये एकाच दिवशी विक्रमी ३ हजार ६५० जात प्रमाणपत्रांचे यशस्वीरित्या वाटप करण्यात आले.

प्रशासकीय यंत्रणेने या मोहिमेसाठी गेल्या दोन महिन्यांपासून तयारी केली होती. तहसील कार्यालय धारणीच्या चमुने तालुक्यातील सर्व

**पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाचा ऐतिहासिक विक्रम**

ग्राम महसूल अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक गावात जात प्रमाणपत्रांचे अर्ज नि:शुल्क उपलब्ध करून दिले होते. नागरिकांकडून हे अर्ज परिपूर्णरित्या भरून घेतल्यानंतर त्यांची सर्व आवश्यक कागदपत्रांसह तहसील कार्यालयात पडताळणी करण्यात आली. अर्जदारांकडून कोणतेही शुल्क न आकारता ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आली. यासाठी लागणारा संपूर्ण निधी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, धारणी यांच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात आला, ज्यामुळे सामान्य आदिवासी बांधवांवर कोणताही आर्थिक भार पडला नाही.

यामध्ये मोगरदा (२८६), बेरदाबलडा (२५१), राणामलूर (२३९), काकरमल (१७९), ढोमणाडाणा (१०८), ढाकरमल (१०७), नांदुरी (१०२), भूलोरी (९७), टोली (९१), तातरा (९०), घोटा (८९), टिटबा(८३) आणि कुटगा(८०) यांसह दुर्गम भागातील बोथरा, हरिसाल, सादराबाडी, दुनी, चिपोली आणि लवादा अशा एकूण ११२ गावांचा समावेश आहे. यामध्ये बोथरा (७४), पोटीलावा (७२), बुलूमगव्हाण (६९), दुनी (५९), सादराबाडी (५७), हरीसाल (५५), नारदू (५१), झिलांगपाटी (५१), चिपोली (५०), मानसुधावडी (४७), झिल्पी (४४), राणीगाव (४०), लवादा (३८), हिराबबई (३८), गडगामालूर (३७), घोटा (३३), राणी तंबोली (३१), मांडू (३१), कुसुमकोट खुर्द (३०), रबाग (३०), केकदाबोड (२९), राणापिसा (२९), बोबदो (२९), धोदरा (२८), पाटिया (२७), ऊकूपाटी (२७), बीबामल (२३), सुसरदा (२२) आणि खोपमार (२०) या गावांचा समावेश आहे. तसेच बिजू धावडी (२०), मांडवा (२०), चौराकुंड (२०), कारा (१९), रेहटा (१७), कावडाझिरी (१८), धारणमहू (१७), राजपुर (१७), सावलखेडा (१६), नागझिरा (१६), चेथर (१५), कोठा (१५), चटवाबोड (१५), सावलीखेडा (१५), जांबु (१४), चीचघाट (१४), गोंडवाडी (१४), कासमार (१३), डापका (१३), गंभेरी (१३), चाकरदा (१२), चोपन (१२), शिरपूर (१२), धुळघाट (११), सावरया (११), धारणी (११), धुळघाट (११), भोडीलावा (११), जाम पाणी (१०), तांगडा (१०), आकी (९), मोखा (९), नागझिरा (८), झापल (८), कढाव (८), काटकुभ (८), टेमली (७), लाकटू (७), नागोडाना (७), बेरदाभुरू (७), खारी (७), गोलाई (६), बोरी (६), भोकरबर्डी (६), टिंगऱ्या (६), बास पाणी (४), गोलांडोह (४), दादरा (४), जामपाणी (४), गोबरकहू (४), पोहरा (३), कारदा (३), गंभेरी (३), खारराटेमरू (३), निरगुडी (३), खापरखेडा (३), पानखाल्ल्या (३), रत्नापूर (२), कसाई खेडा (२), खिडकी (२), बीरोटी (२), चीचघाट (२), दाबिदा (२), बोड (२) आणि बारू (२) या गावांतही प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

## मेळघाटातील विकासकामांवर अडथळे; दिशा बैठकीत खासदार वानखडे संतप्त




प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अमरावती:** मेळघाट परिसरातील विकासकामांना येणाऱ्या अडथळ्यांबाबत झालेल्या 'दिशा' बैठकीत खासदार वानखडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. विशेषतः वन विभागामुळे अनेक विकासकामे रखडत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आणि यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची गरज व्यक्त केली. बैठकीत रस्ते, वीज, पाणी तसेच इतर मूलभूत सुविधांच्या कामांबाबत चर्चा झाली. अनेक प्रकल्प वन परवानग्यांमुळे थांबले असल्याचे सांगण्यात आले. यामुळे स्थानिक नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे खासदार वानखडे यांनी स्पष्ट केले. यावर उपाय म्हणून संबंधित अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक पुढील १५ दिवसांत घेण्याचे निर्देश देण्यात आले. या बैठकीत अडथळ्यांची सविस्तर माहिती घेऊन विकासकामे लवकर सुरू करण्यावर भर दिला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

## विदर्भासाठी संशोधन व नवोपक्रमाचे नवे पर्व; 'व्हि जी राईज सेंटर'चे उद्घाटन



प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अमरावती:** श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन येथे उभारण्यात आलेल्या 'व्हि जी राईज सेंटर'चा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटात व उत्साहात पार पडला. संशोधन, नवोपक्रम, कौशल्य विकास व उद्योजकता यांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करून देणारे हे केंद्र विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी नवे पर्व ठरणार असल्याचे मत व्यक्त करून मान्यवरांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेत आता नव्या उपक्रमास सुरुवात झाल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल असे सांगितले.

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित स्व वसंतराव गुलालकरी राईज (RISE) सेंटरच्या उद्घाटन समारंभ छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून डॉ. माधव जी. लाभे, उद्घाटक म्हणून डॉ. यशवंत काटपातळ , विशेष अतिथी म्हणून समित सिंघई तसेच हरीश मोहोड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले व कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव डॉ. व्ही.जी. ठाकरे, स्वीकृत सदस्य डॉ. अमोल महल्ले, दानदाते प्रशांत गुलालकरी, प्राचार्य डॉ. जी. आर. गोसावी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून हेमंत काळमेघ यांनी सांगितले की, प्रत्यक्ष अनुभव, प्रकल्पाधारित शिक्षण व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे, हा या केंद्राचा मुख्य हेतू आहे. व्हि जी राईज म्हणजे रिसर्च, इनोव्हेशन, स्किलिंग व एंटरप्रेन्युअरशिप. या चार स्तंभांवर आधारित एकात्मिक परिसंस्था येथे विकसित करण्यात आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आयओटी, रोबोटिक्स, इलेक्ट्रिक व्हेईकल, स्मार्ट ॲग्रीकल्चर, स्मार्ट हेल्थकेअर आदी क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम करण्याची संधी सेंटरच्या माध्यमातून मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. संशोधन व नवोपक्रम प्रयोगशाळा, प्रोटोटाइप विकासासाठी स्वतंत्र सुविधा, स्टार्टअपसाठी को-वर्किंग स्पेस तसेच सेमिनार हॉल्स, मीटिंग रूम इ. अत्याधुनिक पायाभूत सुविधा येथे उपलब्ध असणार आहे. विविध संस्थांमधील आंतरशाखीय संशोधन व उद्योग-शैक्षणिक सहकार्य वाढविण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे सुमित सिंघई यांनी सांगितले. सेंटरबाबत बोलताना प्रशांत गुलालकारी यांनी सांगितले की, 'विदर्भातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या संधींसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, या उद्देशाने राईज सेंटरची संकल्पना मांडली. शिक्षण व उद्योग यांच्यातील दरी कमी झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना नोकरी शोधणारे नव्हे, तर रोजगारनिर्माते बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे.' आपल्या वडिलांच्या वसंतराव गुलालकरी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे केंद्र सुरू केल्याचे सांगत त्यांनी मूल्याधिष्ठित शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि प्रादेशिक विकास यावर भर दिला. व्हि जी राईज सेंटरमुळे विदर्भात संशोधन संस्कृतीला चालना मिळेल, स्थानिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधले जातील.

## कर्जमाफी झाली नाही तर १ जुलैपासून रेल्वे रोको!

### माजी मंत्री बच्चू कडू यांचा पत्रकार परिषदेतू इशारा

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**चांदूर बाजार :** यावर्षी शेतकरी वर्गाचे सर्वात मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सरकारने घोषित केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, त्यांना आपल्या घोषणेची आठवण करून देण्यासाठी आम्ही सलोना ते चिखलदरा पायी पदयात्रा काढून मेळघाट संघर्ष यात्रा महामोर्चा १ मार्च रोजी काढण्यात येणार आहे. तसेच तरीही कर्जमाफी झाली नाही तर १ जुलैला राज्यभर रेल्वे रोको आंदोलन करण्यात येणार आहे, असा इशारा माजी मंत्री बच्चू कडू यांनी चांदूर बाजारच्या कुरळ पूर्णा येथील पत्रकार परिषदेतून दिला.

मेळघाटातील ऐतिहासिक अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभाव मिळावा, त्यांना घोषित केलेली कर्जमाफी मिळावी, यासाठी मेळघाट संघर्ष यात्रा महामोर्चा काढण्यात येणार आहे. सरकारला शेतकऱ्यांच्या दु:खाची जाणीव व्हावी म्हणून २५० किलो मीटर सलोना ते चिखलदार अशी पदयात्रा काढण्यात येणार आहे, असेही बच्चू कडू म्हणाले. सरकारला आपल्याच घोषणेचा विसर पडला असून, ते कर्जमाफी न करता फक्त थकीत कर्ज माफ करण्याच्या विचारात आहेत. वास्तविक पाहता २०२५-२६ या वर्षांत शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत आहे.

## शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा -खासदार बळवंत वानखडे



प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अमरावती** : केंद्र शासनाच्या वतीने सर्व सामान्य नागरिकांच्या हितासाठी विविध योजना राबविण्यात येतात. जिल्ह्यात प्रामुख्याने मेळघाटातील आदिवासी भागातील जनतेचे जीव सुकर व्हावे, यासाठी त्यांच्यासाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ विनाव्यत्यय देण्यात याव्यात, असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी दिले.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा खासदार श्री. वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी आमदार गजानन लवटे, प्रविण तायडे, महापौर श्रीचंद तेजवाणी, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, परीविक्षाधिन अधिकारी कौशल्या एम., अशासकीय सदस्य मोरेश्वर वानखडे, जिल्हा विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांच्यासह नगरपालिकेचे अध्यक्ष उपस्थित होते. खासदार श्री. वानखडे म्हणाले, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील कंत्राटी कर्मचारी संपावरून परत आले आहे. त्यामुळे येत्या काळात कामावरील मजूर परत येतील, याची काळजी घ्यावी. मेळघाटात होळी हा सण महत्त्वाचा असल्याने मजूरी वेळेवर करण्यात यावेत. धारणी परिसरातील मका खरेदीची रक्कम शेतकऱ्यांच्या हाती पडावी, यासाठी प्रयत्न करावेत. यासोबतच मेळघाटातील रस्ते, पाणीपुरवठा, वीज, इंटरनेट यासारख्या सुविधा देताना वन विभागाच्या परवागींची अडसर येत आहे. त्यामुळे वन विभागाने पुढाकार घेऊन परवानगी आवश्यक असणाऱ्या विभागांशी समन्वय साधावा. तसेच या परवानगी तातडीने मिळावी, यासाठी पुढाकार घ्यावा. ष्केंद्र शासनाच्या वतीने प्रधानमंत्री ग्रामसडक योजना राबविण्यात येत आहे. त्यामुळे प्रामुख्याने ग्रामीण भागातील रस्ते दुरूस्ती करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. ही कामे चांगल्या दर्जाचे होण्यासाठी प्रयत्न करावेत.

## 'राज्यस्तरीय खादी प्रदर्शन व महोत्सवा'चे आयोजन

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अमरावती:** खादी आणि ग्रामोद्योग आयोग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय (भारत सरकार) यांच्यामार्फत दि. २० फेब्रुवारी २०२६ ते ०१ मार्च २०२६ या कालावधीत अमरावती येथे 'राज्यस्तरीय खादी प्रदर्शन' आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन गाडगे नगर, वलगाव रोड येथील संत गाडगे बाबा समाधी स्थळ यात्री मैदान येथे संपन्न होईल.

खादी आणि ग्रामोद्योग आयोग ही संसदेच्या कायद्याद्वारे स्थापन झालेली वैधानिक संस्था असून, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे आणि लोकांना स्वावलंबी बनवणे हे आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## जिल्ह्यात उत्सवांच्या काळात ध्वनीक्षेपकांना रात्री १२ पर्यंत मुभा

### जिल्हाधिकाऱ्यांचे १५ दिवसांच्या शिथिलतेचे आदेश

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अमरावती:** आगामी विविध सण आणि उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील नागरिकांसाठी प्रशासनाने मोठा दिलासा दिला आहे. जिल्ह्यात ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेच्या वापरासाठी वर्षभरातील एकूण १५ दिवसांची विशेष शिथिलता देण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहेत. केंद्र शासनाच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम २०१७ मधील तरतुदींचा आधार घेत ही परवानगी देण्यात आली आहे. या आदेशानुसार, निश्चित केलेल्या उत्सवांच्या दिवशी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक वापरता येणार आहे. एरव्ही रात्री १० वाजेपर्यंत असलेली ही मर्यादा आता काही विशेष दिवसांसाठी वाढवण्यात आली आहे. ज्या उत्सवांसाठी ही सवलत लागू असेल त्यात प्रामुख्याने १९ फेब्रुवारी रोजीची शिवजयंती, २६ मार्चला श्रीराम नवमी, १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि १ मे रोजीच्या महाराष्ट्र दिनाचा समावेश आहे. तसेच वर्षाच्या उत्तरार्धात ४ सप्टेंबरला श्रीकृष्ण जयंती, १४ सप्टेंबरला गणपती उत्सव, २५ सप्टेंबरला अनंत चतुर्दशी आणि १५ ऑक्टोबरला नवरात्र पंचमीसाठी ही सूट असेल. नवरात्रीचे मुख्य दोन दिवस म्हणजे १९ व २० ऑक्टोबर, तसेच दिवाळीमध्ये ६ नोव्हेंबरला धनत्रयोदशी आणि ८ नोव्हेंबरला लक्ष्मीपूजनाच्या दिवशीही रात्री १२ पर्यंत ध्वनीक्षेपक सुरू ठेवता येतील. वर्षाच्या शेवटी २५ डिसेंबर (नाताळ) आणि ३१ डिसेंबर रोजीही ही सवलत लागू राहील. मात्र, ही शिथिलता देताना जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी काही कडक अटीही घातल्या आहेत. झोननिहाय ठरवून दिलेली ध्वनी मर्यादा कोणत्याही परिस्थितीत ओलांडता येणार नाही. विशेषतः रुग्णालय, शैक्षणिक संस्था आणि न्यायालये यांसारख्या 'शांतता क्षेत्र' घोषित परिसरात ही सवलत लागू असणार नाही. नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित आयोजक आणि यंत्रणेवर राहील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी आणि उत्सव मंडळांनी प्रशासकीय नियमांचे पालन करून उत्सव शांततेत साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

**खामगाव**

## युगधर्म पब्लिक स्कूल येथे मातृपितृ पूजन सोहळा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**खामगाव :** स्थानिक सूर्यदय एजुकेशन सोसायटीद्वारा संचलित युगधर्म पब्लिक स्कूल येथे १४ फेब्रुवारी रोजी मातृपितृ पूजन सोहळा अत्यंत भक्तिमय, संस्कारमय व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास पालक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे संपूर्ण शाळा परिसरात आदर, कृतज्ञता व संस्कारमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल उपस्थित होते, तर कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य अनिरुद्ध अवचार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानाची आराध्य देवता माता सरस्वती यांच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे विधीपूर्वक पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी पालकांचे चरणस्पर्श करून आशीर्वाद घेतला. यावेळी अनेक पालक भावूक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मातृ-पितृभक्ती, कुटुंबीयांविषयी आदर, संस्कारमूल्ये व सामाजिक बांधिलकी यांची जाणीव दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मातृ-पितृप्रेम दर्शविणारी भाषणे, गीत, श्लोक व सांस्कृतिक सादरीकरणे सादर केली. 'आई-वडील हेच प्रथम गुरु आहेत' हा संदेश विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे मांडला. पालकांनीही शाळेच्या या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा संस्कारक्षम कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

पालकांनी व्यक्त केले मनोगत

या वेळी पालकांनी आपले मनोगत व्यक्त करत शाळेच्या संस्कारप्रधान शिक्षणपद्धतीचे कौतुक केले. वर्ग सहावीच्या पालक सौ. सोंटक्के यांनी सांगितले की, 'माझा मुलगा नेहमी सांगतो की आमच्या शाळेत संस्कृत श्लोक, हनुमान चालीसा, गणपती स्तोत्र व पसायदान यांचे नियमित पठण केले जाते. पालक या नात्याने मला अभिमान वाटतो की माझा मुलगा संस्कारांचे जतन करणाऱ्या युगधर्म शाळेत शिक्षण घेत आहे.'

तसेच सौ. देशमुख यांनी आपल्या मनोगतात आजच्या आधुनिक काळात मुलांमध्ये चांगल्या संस्कारांची नितांत गरज असल्याचे सांगितले. युगधर्म शाळा विद्यार्थ्यांमध्ये हे संस्कार रुजविण्याचे कार्य करत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. श्री सव्वालाखे यांनी मातृपितृ पूजनासारखा संस्कारक्षम कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल शाळेचे आभार मानले. यावेळी अध्यक्ष गोपालजी अग्रवाल यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आधुनिक युगात मुलांमध्ये संस्कार व कुटुंबमूल्यांची जपणूक होणे अत्यंत आवश्यक असून अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास मोठी चालना मिळते.

## खामगाव नगर परिषदेने वाढीव मालमत्ता कर रद्द करावा : गणेश चौकसे

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**खामगाव:** खामगाव नगर परिषदेने वाढविलेला मालमत्ता कर रद्द करावा या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी १७ फेब्रुवारी रोजी नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन दिले. सदर निवेदनात नमूद आहे की महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम १०५ यातील मुद्दा क्रमांक ४ च्या नुसार कोणत्याही परिस्थितीत मागील कराच्या ४० टक्के पेक्षा जास्त कारवार करता येत नाही. असे असताना खामगाव नगर परिषदेने शहरातील नागरिकांच्या मालमत्ता करत प्रचंड वाढ केली आहे तसेच शहराला नियमित पाणीपुरवठा होत नसताना सुद्धा पाणीपट्टी कर हा १२०० रुपयावरून १८०० रुपये करण्यात आला आहे. ही वाढ अन्याकारक असून नागरिकांच्या मनात तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. वास्तविक पाहता नगरपालिका प्रशासनाकडून मूलभूत सुविधांचा बट्ट्याबोळ झाला आहे. शहरातील अनेक स्वच्छतागृहांमध्ये घाणीचे साम्राज्य आहे, अनेक चौकामध्ये कचऱ्याचे मोठमोठे ढिग पडलेले दिसतात. एकीकडे मूलभूत सुविधेचा अभाव असताना प्रचंड प्रमाणात हुकूमशाही पद्धतीने मालमत्ता कर वाढवून नागरिकांवर अन्याय करण्यात आला. हा अन्याय राष्ट्रीय ओबीसी महासंघ सहन करणार नाही. पंधरा दिवसाच्या आत सदर प्रकरणात योग्य ती दखल न घेतल्यास नगरपरिषद परिसरामध्ये वाढीव कराच्या नोटीससेची होळी करण्यात येईल व गांधीगिरीच्या मार्गाने अनेक प्रकारचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी दिला आहे.

# टाऊन हॉल की 'अवैध धंद्यांचा मॉल'?

**भरदिवसा दारू-गांज्याची विक्री**

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**तेल्हारा :** शहराच्या मध्यवर्ती भागातील टाऊन हॉल परिसर सध्या अवैद्य धंद्यांचे केंद्र बनल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. भरदिवसा दारू अड्डे, गांज्याची विक्री तसेच संशयास्पद हालचाली सुरू असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे.

सार्वजनिक मालमत्ता असलेल्या या ठिकाणी बेकायदेशीर कृत्ये उघडपणे सुरू असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. टाऊन हॉलच्या शेजारीच असलेल्या क्रीडा संकुलात दररोज मोठ्या संख्येने युवक-युवती सरावासाठी येत असतात. क्रीडांगणात घाम गाळणाऱ्या तरुणाईसमोर काही अंतरावरच अवैध दारू व नशेच्या पदार्थांची देवाणघेवाण सुरू असल्याचे चित्र संतापजनक आहे. पालकवर्गाने याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली असून, 'खेळाच्या मैदानावर येणाऱ्या मुलांच्या भवितव्याशी हा थेट खेळ आहे,' अशी प्रतिक्रिया दिली आहे.

यापूर्वी सामाजिक कार्यकर्ते विशाल नांदोकार यांनी टाऊन हॉलमध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करण्याची मागणी केली होती. शहरात स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना शांत व सुरक्षित अभ्यासाची जागा उपलब्ध व्हावी, हा उद्देश होता. मात्र, त्या प्रस्तावाकडे दुर्लक्ष झाल्याने आज तीच इमारत अवैद्य कृत्यांचे आश्रयस्थान ठरत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिकांच्या मते, सायंकाळी आणि रात्री उशिरापर्यंत येथे संशयास्पद गर्दी वाढते. काही वेळा किरकोळ वाद, आरडाओरड आणि भांडणेही होत असल्याचे सांगितले जाते. परिसरातील व्यावसायिक व रहिवासी यांना भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. 'आम्ही अनेकदा तोंडी तक्रार केली, पण ठोस कारवाई दिसली नाही,' असा आरोपही नागरिकांकडून करण्यात आला आहे.

नगर पालिका व स्थानिक प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे सार्वजनिक मालमत्ता गुन्हेगारी प्रवृत्तींना खतपाणी घालत असल्याची भावना शहरात पसरली आहे. जर वेळेत कडक पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. क्रीडा संकुल, शैक्षणिक वातावरण आणि सभोवतालचा परिसर सुरक्षित ठेवणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे, असे मत ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले. दरम्यान, शहरातील विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे. टाऊन हॉल परिसरात तातडीने पोलीस बंदोबस्त वाढवून अवैद्य धंद्यांवर कारवाई करावी, सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि इमारतीचा विधायक वापर—अभ्यासिका, वाचनालय किंवा युवकांसाठी उपयुक्त उपक्रम—यासाठी निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

## डॉ. तरंगतुषार वारे सहायक संचालकपदी रुजू

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** अकोला जिल्हा शल्य चिकित्सकपदावरुन निलंबित झाल्यानंतर डॉ. तरंगतुषार वारे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या उपसंचालक कार्यालयात सहायक संचालक म्हणून नियुक्ती झाली आहे. १७ फेब्रुवारी रोजी त्या उपसंचालक कार्यालयात सहायक संचालक म्हणून रूजू झाल्या. जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या एका निविदा प्रकरणात तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे यांच्यासह लेडीहार्डिंग्जचे वैद्यकीय अधीक्षक, कार्यालय अधीक्षक निलंबित झाले होते.

## घरोघरी शिवजयंती साजरी करा

**मराठा महासंघाचे आवाहन**

**अकोला :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १९ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यातील नागरिकांनी घरोघरी शिवजयंती उत्साहात साजरी करावी, असे आवाहन मराठा महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष निळोबा ढोरे व उपाध्यक्ष सतीश सुर्वे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

## अडगांव बु. येथे 'शिवपुराण' कथेस प्रारंभ

**अडगांव बु. :** येथील महासिध्देश्वर संस्थान शिव नगर च्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'शिवपुराण' कथेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १५/२/२६ पासुन कथेला सुरुवात झाली असून संपूर्ण परिसरात सध्या शिव नामाचा जयघोष घुमत आहे. कथावाचक ह.भ.प. प्रवीण महाराज चिंचोलीकर यांच्या मधुर वाणीतून या कथेचे वाचन होत आहे. दि. २२ फेब्रुवारी रोजी कथेची सांगता होईल. त्याच दिवशी सायंकाळी गावातून ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे. दि. २३ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व भाविक भक्तांनी या कथेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे संस्थानच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

## निधन वार्ता

**डॉ. सलीम पातूरकर**



**हिवरखेड:** येथील डॉ. सलीम पातूरकर यांचे १६ फेब्रुवारीला निधन झाले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

# सुकळी येथे श्री संत नामदेव महाराज यात्रे निमित्त शिवमहापुराण कथा

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**अकोट:** सुकळी येथील संत श्री नामदेव महाराज यात्रा महोत्सवानिमीत्त शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रा महोत्सवाची सांगता १८ ला होणार आहे.त्यानिमित्त शिवमहापुराण कथा व अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.बुधवार दि.११-०२-२०२६ ला तीर्थ स्थापना होऊन सप्ताहास प्रारंभ होईल.सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम ५ ते ६ काकडा,८ ते ११ भजन,११ ते १ भोजन अवकाश व दुपारी १ ते ५ शिवमहापुराण कथा,सायं.६ ते ७ हरिपाठ व ७ ते ८ भोजन अवकाश,व रात्री ८ ते १० हरिकीर्तन होईल.कथावाचक वाणीभुषण ह.भ.प.विठ्ठल महाराज खलोकार (श्री क्षेत्र भक्तीसागर) अकोलखेड हे आहेत.तथा या सप्ताहातील दैनंदिन कीर्तनकार बुधवार ११फेब्रु.ला ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज भुष्कट वडाळी.गुरुवार दि.१२ फेब्रु.ला ह.भ.प. कु.श्वेताताई क्षीरसागर शिरसोली.शुक्रवार दि.१३फेब्रु.ला ह.भ.प.साक्षीताई कावरे अकोलखेड शनिवार दि.१४फेब्रु.ला ह.भ.प.अच्युत महाराज बोरोडे वडाळी,रविवार दि.१५ फेब्रु.ला ह.भ.प.विजय महाराज चिचोळकर,अकोट सोमवार दि.१६ फेब्रु.ला ह.भ.प.सोपान महाराज लोखंडे शिरसोली, मंगळवार दि.१७ फेब्रु.ला ह.भ.प.कोंडीराम महाराज नागरगोजे (बोर्डीकर.)बुधवार दि.१८ फेब्रु.ला ह.भ.प.विठ्ठल महाराज खलोकार,यांचे दहीहंडी व काल्याचे कीर्तन राहील व रात्री ८ वा सत्यपाल महाराज यांचे शिष्य अक्षयपाल महाराज आगरकर यांचा समाजप्रबोधनपर कार्यक्रम राहील.तसेच गायनाचार्य ह.भ.प.गोपाल महाराज काळे,ह.भ.प.मुरली महाराज यावलकर, ह.भ.प.गोपाल महाराज मनतकार,ह.भ.प.ओमचंद महाराज हंतोडे,ह.भ.प.गोपाल महाराज वाघमारे,मृदंगाचार्य ह.भ.प.रवी महाराज वाघमारे,ह.भ.प.योगेस महाराज नागरगोजे.टाळकरी मंडळी,-श्रीकृष्ण सौंदळेकर,करण ठाकरे,रवी हरमकार, महादेव मदनकार,विनोद मारोटकार व नागा स्वामी महाराज भजन मंडळ बोर्डी. विणेकरी-ह.भ.प.महादेव मासोदकार,त्र्यंबक बुंदे,रामदास भगत दिंडी सहभाग -श्री नागास्वामी महीला मंडळ बोर्डी,शबरी माता महीला भजनी मंडळ,श्री वीठ्ठल रुख्मीणी महीला भजनी मंडळ शिवपुर,श्री गुरुदेव भजनी मंडळ,संत नामदेव महाराज ढोल भजनी मंडळ सूकळी, हनुमान महीला भजनी मंडळ मोहाळा, महीला सांप्रदायिक भजनी मंडळ सुकळी,महीला सांप्रदायिक भजनी मंडळ रामापुर व पंचक्रोशीतील वारकरी राहतील. तसेच बुधवार दि.१८ फेब्रु.ला सकाळी ७ वा. दिंडी सोहळा व श्री नामदेव महाराजांचे पालखीची गावातुन भव्य मिरवणूक काढण्यात येईल,त्यानंतर काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाला सुरुवात होईल.या भागवत सप्ताहाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री नामदेव महाराज संस्थान,अध्यक्ष,संचालक मंडळ व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.सप्ताहाचे आयोजन व नियोजन गंगाधर गावंडे,विठ्ठल चवाळे हे करीत आहेत.

# बाभुळगाव येथे सभागृहाचे लोकार्पण व श्रीमद् भागवत सप्ताह

**♦ आमदार सावरकर यांची भेट**



प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** आमदार रणधीर सावरकर यांच्या स्थानिक निधी अंतर्गत मौजे बाभुळगाव येथे शिव मंदिर सभागृहाचा लोकार्पण सोहळा पार पडला.

या शुभ प्रसंगी श्रीमद् भागवत सप्ताह कार्यक्रमाला भेट देत वारकरी बांधवांचा आशीर्वाद आ. सावरकर यांनी घेतला. यावेळी भाजपचे उत्तर मंडळ अध्यक्ष प्रवीण हगवणे, महेंद्र काळे,विवेक हरणे,किशोर काकडे,आशिष ढोमणे, संतोष डोंगरे, संजय देशमुख, उमेश गावंडे, गजानन चंदनगोळे, सतीश गावंडे, रवी गावंडे, श्रीकांत इंगळे,किशोर गावडे,साहेबराव डोंगरे तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजयुमोचे केंद्रीय अर्थसंकल्प प्रचार प्रसार अभियान अंतर्गत युवा विद्यार्थी संमेलन

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोट:** १७ फेब्रुवारी रोजी अकोट येथे 'भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा अकोला जिल्हा' वतीने 'केंद्रीय अर्थसंकल्प प्रचार-प्रसार अभियान' अंतर्गत अकोट शहर येथील टारगेट अकॅडमी, केशवराज मंदिर सभागृह येथे युवा-विद्यार्थी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

यासंदर्भात मार्गदर्शन करण्याकरिता भाजपचे डॉ. संजय शर्मा, भाजपा अकोला जिल्हा सरचिटणीस राजेश नागमते, भाजपचे आदिवासी नेते उमेश पवार उपस्थित होते. भाजपा अकोट शहर मंडळ अध्यक्ष हरीश टावरी, शहर युवा मोर्चा अध्यक्ष मयुर नाठे, चेतन देवळे, राधेश्याम ताडे यांच्यासह युवक, विद्यार्थी व कार्यकर्ते



उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी या बजेटला युवा-शक्तीचा भविष्य-धोरण म्हणून मांडले आहे, तसेच या बजेटमध्ये विद्यार्थ्यांना मुख्य स्थान दिले आहे. नवे डिजीटल कौशल्य उत्कृष्टपणे शिकवण्याचे कार्यक्रम, आणि महत्वाच्या तंत्रज्ञान शिक्षणासाठी संसाधनांचा विस्तार याविषयीची माहिती देण्यात आली. टारगेट अकॅडमी चे संचालक कैलाश वर्मा यांचे स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी क्लासेस मार्फत करत असलेल्या कामगिरी बद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष योगेश गोतमारे यांनी केले होते.

# आळंदा रूस्तमाबादच्या शिव मंदिरात भागवत सप्ताह यात्रा महोत्सव



आजमखान १८ फेब्रुवारी

**बार्शिटाकळी:** आळंदा रुस्तमबाद येथे शंभर वर्ष जुने हेमाडपंती मंदिर असून या मंदिरात महाशिवरात्री निमित्त भागवत सप्ताह, यात्रा उत्सव साजरा करण्यात येतो. गावातील लोक सलोखा ठेवून उत्सव साजरा करतात. माहेरवाशिणी खास यात्रेसाठी येतात. भागवत सप्ताहात सहभागी होतात.

भागवत कथेला अतिशय चांगला प्रतिसाद मिळतो. या यात्रेमध्ये अकोला, बार्शीटाकळी, कान्हेरी, पिंजर, महान, धाबा येथील भाविक सप्ताहात सहभागी होतात. महादेवाचे दर्शन घेऊन महादेवाच्या नंदीच्या कानामध्ये नवस करतात. यात्रेत नवस फेडला जातो. दर्शनाकरिता मोठ्या प्रमाणात गर्दी उसळते. महाप्रसादासाठी ३५ ते ४० क्विंटल जवारीच्या भाकरी व २५ ते ३० क्विंटल मिसळीचे वरण तयार केले जाते. प्रसादाची तयारी सकाळ पासून केली जाते. कित्येक वर्षांपासून परंपरा गावाने जोपासली आहे. मंदिराचे अध्यक्ष सतीश ढोमणे व उपाध्यक्ष रामदास म्हैसने यांच्या मार्गदर्शनाखाली महाप्रसादाची तयारी केली जाते.

# माता नगर परिसरात अनियंत्रित स्कॉर्पिओने रिक्षा आणि दुचाकीला उडवले

**◆ घटनेत तीन जण गंभीर जखमी**

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला:** रामदासपेठ पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या माता नगर परिसरात तीन वाहनांमध्ये झालेल्या एका विचित्र अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तिन्ही वाहने रस्त्यावरून बाजूला हटवली आणि वाहतूक सुरळीत केली.

अकोल्यातील रामदासपेठ पोलीस ठाण्याजवळील माता नगर भागात एका भरधाव वेगाने येणाऱ्या स्कॉर्पिओ गाडीने प्रथम रस्त्यावर उभ्या असलेल्या रिक्षाला



जोरदार धडक दिली आणि त्यानंतर ही स्कॉर्पिओ एका मोटारसायकलला जाऊन धडकली. रिक्षामध्ये काही प्रवासी बसलेले होते. ही धडक इतकी भीषण होती की, घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.

या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले असून स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या धडकेत रिक्षेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अपघातामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच रामदासपेठ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून अपघातग्रस्त वाहने बाजूला केली आणि वाहतूक पूर्ववत केली. पोलिसांनी याप्रकरणी पुढील तपास सुरू केला आहे. अपघातातील जखमींनी आपली आपबीती सांगताना सांगितले की, ठआम्ही रिक्षामध्ये बसलो होतो, तेव्हा अचानक समोरून येणाऱ्या स्कॉर्पिओने रिक्षेला जोरदार धडक दिली.

# आरोग्यसोबत घुमला 'झाडे जगवा'चा मंत्र; पिता-कन्येच्या जनजागृतीची वाकेथॉनमध्ये भुरळ

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** आरोग्याप्रती जागरूक अकोलेकरांसाठी आयोजित 'तीक्ष्णगत आयएमए वाकेथॉन-२०२६' मध्ये केवळ शारीरिक तंदुरुस्तीच नाही, तर पर्यावरण संवर्धनाचाही प्रभावी संदेश देण्यात आला. या उपक्रमात वृक्ष मित्र सुनील गोहर आणि त्यांची कन्या आंचल गोहर यांनी दिलेला ङ्घझाडे लावा, झाडे जगवाङ्ग हा संदेश वाकेथॉनमध्ये आकर्षण ठरला.

भारतीय वैद्यकीय संघटना आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लाल बहादूर शास्त्री




स्टेडियम येथे या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय पॅराथलीट संगीता विष्णोई यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली होती. हजारो नागरिक आणि शालेय चिमुकल्यांच्या गर्दीत वृक्ष मित्र सुनील गोहर आणि आंचल यांनी पर्यावरण संवर्धनाची जनजगृती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. धावण्यासोबतच निसर्ग वाचवण्याचा हा दुहेरी उद्देश उपस्थितांना भावला. केवळ व्यायाम करून आरोग्य सुधारत नाही, तर त्यासाठी शुद्ध हवा आणि निसर्गाचीही गरज आहे, हा विचार या पिता-कन्येने आपल्या उपक्रमातून मांडला. त्यांच्या या कल्पक जनजागृतीला नागरिकांनी पर्यावरणपूरक प्रयत्नांचे कौतुक केले.

# गायत्री नगरात होणाऱ्या कीर्तन महोत्सवाचे मंडप भूमिपूजन

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** गायत्री नगर व परिसरातील नागरिकांद्वारा संत तुकाराम महाराज बीजोत्सवानिमित्त होळीच्या शुभपर्वावर कीर्तन महोत्सवाचे आयोजन ५ ते १३ मार्च २०२६ दरम्यान करण्यात आले आहे. रविवारी मंडपाचे भूमिपूजन भागवताचार्य सुजित महाराज देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व समितीचे मार्गदर्शक हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या हस्ते तथा हभप वासुदेव महाराज महल्ले, हभप मनोहर महाराज डुकरे, हभप रामदयाल इंगळे व हभप पवार काकू यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

सर्वप्रथम भगवान शंकर महादेव, श्री संत माऊली ज्ञानेश्वर महाराज संत तुकाराम महाराज



यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले लगेच तदनंतर मान्यवरांच्या हस्ते कुदळ मारून मंडप भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी बीजोत्सव सेवा समितीच्या वतीने मान्यवरांचे हार घालून स्वागत करण्यात आले. आताच्या धकाधकीच्या व गतिमान जीवनशैलीत भौतिक सुखाने संपन्न असलेल्या समाजाला आध्यात्मिक समाधान व शांती प्राप्ति करिता अशा कीर्तनाची आवश्यकता आहे आणि येथे होऊ घातलेले सर्व कीर्तनकार हे वारकरी संप्रदायातील मोठमोठ्या परंपरेतील शिस्तीत तयार झालेले सर्व तपस्वी होळकरी कीर्तनकार असून त्यांचे येथे कीर्तन होणार आहे असे मत ह भ प प्रशांत महाराज ताकोते यांनी व्यक्त केले आहे. यावेळी ह भ प वासुदेव महाराज महाले पाटील, ह भ प मनोहर महाराज डुकरे, ह भ प रामदयाल इंगळे यांनीही आपले मत व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष सुजित महाराज देशमुख यांनीही संतांच्या चरित्रावर प्रकाश टाकून सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाला समितीचे सर्व पदाधिकारी व परिसरातील भाविक भक्त, महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन समितीचे हभप गजानन गावंडे तर आभार प्रदर्शन प्राध्यापक सुरेश मार्के यांनी केले. हा भव्य दिव्य किर्तन महोत्सव ९ दिवस चालणार असून दररोज सकाळी पाच ते सहा काकडा भजन, सकाळी दहा ते बारा व दुपारी दोन ते तीन गाथा पारायण, सायंकाळी पाच वाजता हरिपाठ व रात्री आठ ते दहा महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बीजोत्स व सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## गजानन महाराज विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील श्री राजे शिव छत्रपती मंडळ च्या वतीने जय गजानन चौक शास्त्रीनगर अकोला येथे येणाऱ्या रविवार २२ फेब्रुवारीला विदर्भाची पंढरी शेगांवचे संत श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त सामूहिक विजय ग्रंथ पारायण चे आयोजन करण्यात आले होते. श्री निलेश महाराज कपले यांच्या अमृततुल्य वाणीतून पारायणाचे पठण होणार असून समस्त श्रद्धावान भक्तांनी स्वतःची श्री विजय ग्रंथ पोथी सोबत आणून पारायण करण्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी सकाळी ११:३० वाजता पारायण प्रारंभ होणार असून दुपारी २:३० ते ३ वाजेपर्यंत फराळ निमित्य विश्राम राहील.

# बाळापुर तालुक्यात रेती माफियांचा उच्छाद

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**हातरूण :** बाळपूर तालुक्यातील ग्राम सोनाळा, बोरगाव वैराळे, जानोरी, हातरुण भागात बेकायदेशीर रेती उत्खनन व वाहतुकीने थैमान घातले आहे. लिलाव न झालेल्या नदी घाटांवरून जेसीबीने रात्री बेरात्री ट्रॅक्टर, डंपरच्या रांगा लागत असून शासनाच्या डोळ्यादेखत कोट्यवधींची रेती चोरीला जात आहे. हा सारा प्रकार प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सुरू असताना वाहतूक विभाग, महसूल प्रशासन आणि संबंधित यंत्रणा मात्र संशयास्पद शांतता बाळगून आहेत. प्रश्न असा उपस्थित होतो की हे अधिकारी अज्ञानात आहेत की जाणूनबुजून डोळेझाक करत आहेत?



दिवसा शांत दिसणारे घाट रात्री माफियांच्या ताब्यात जातात. अंधाराचा फायदा घेत खुलेआम उत्खनन, ओव्हरलोड वाहतूक, कोणतीही परवानगी नसताना रेतीची खुलेआम विक्री सुरू आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या बेकायदेशीर उत्खननामुळे शासनाला मोठ्या प्रमाणात महसुलाचा फटका बसत आहे. नदीपात्रांचे संतुलन बिघडत असून भविष्यात पूर, भूक्षय आणि पर्यावरणीय आपत्ती ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण याची फिकीर कोणालाच नाही, असे सध्याचे चित्र आहे. या गंभीर बाबींवर प्रशासनाने नियंत्रण आणावे तसेच गैरप्रकार थांबवावे अशी मागणी केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# एकतर्फी प्रेमातून तरुणीवर वार; आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**यवतमाळ :** जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यात पाच वर्षांपूर्वी एकतर्फी प्रेमातून तरुणीवर चाकूने प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपीला आज जिल्हा न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसेच त्याच्यावर तीन हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास अतिरिक्त सहा महिने सश्रम कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

चिंतामन कवडु पुसनाके (वय ३०, रा. इंदिरा आवास, घाटंजी) असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे. घटनेची हकीकत अशी की, २९ जानेवारी २०२१ रोजी पीडित तरुणी आणि तिची बहिण घाटंजी परिसरातील शेतात कापूस वेचण्यासाठी गेल्या होत्या. त्याचवेळी आरोपी चिंतामन कवडु पुसनाके (वय ३०, रा. इंदिरा आवास, घाटंजी) याने पीडितेच्या होणाऱ्या पतीला मोबाईलवर फोन करून "तिला फोन करू नको" असा इशारा दिला. त्यानंतर रागाच्या भरात त्याने पीडित तरुणीला विचारले, "तू कशी काय लग्न करते?" एकतर्फी प्रेमाच्या नादात संतापलेल्या आरोपीने चाकू काढून तरुणीवर सपासप जवळपास ११ वार केले. पीडितेच्या पोटात चाकूचा एक भाग तुटून आत राहिला होता.

पीडितेच्या बहिणीने तात्काळ काकांना फोन करून घटनेची माहिती दिल्यानंतर पीडितेला यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. डॉ. स्वप्नील मदनकर यांनी यशस्वी शस्त्रक्रिया करून तुटलेला चाकूचा भाग काढला आणि पीडितेचा जीव वाचवला.

घटनेची तक्रार पीडितेचे नातेवाईक सुरेश देवराव ढोणे यांनी घाटंजी पोलीस ठाण्यात दिली. पोलीस उपनिरीक्षक किशोर भुजाडे यांनी तपास करून आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०७ (खूनाचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला. तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाले.

न्यायालयीन सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाकडून फिर्यादी, पीडित तरुणी, तिची बहिण, डॉ. स्वप्नील मदनकर आणि इतर सात साक्षीदार तपासण्यात आले. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किशोर भुजाडे यांची साक्षही महत्त्वाची ठरली. जिल्हा न्यायाधीश एस. यु. बघेले यांनी सर्व पुराव्यांचा विचार करून आरोपी दोषी ठरवला आणि जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

या प्रकरणात सहाय्यक सरकारी वकील ॲड. उदय के. पांडे यांनी सरकारी पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. पोलीस ठाण्याचे पैरवी अधिकारी हवालदार सारीका बोधनकर यांचे सहकार्य लाभले.

# बनावट देशी मद्य विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## पुसदमध्ये तिघांना अटक : २ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**पुसद :** यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई करत बनावट देशी मद्य विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. शेंबाळपिंपरी येथे धाड टाकून विभागाने हजारो बनावट लेबले, बुच आणि बनावट मद्य जप्त केले. या प्रकरणात तिघांना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयाने दोन दिवसांची एक्साईज कोठडी सुनावली आहे.

जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत २ लाख १ हजार ४० रुपये इतकी आहे. आरोपींकडून 'भिंगरी संत्रा' या नावाचे ९० मिली क्षमतेचे ९,४५० बनावट लेबले (अंदाजे ४७,२५० रुपये), 'भिंगरी बावणकाशी संत्रा'चे २,००० ओरिजनल लेबले (६,००० रुपये), ९०० बनावट बुच/झाकणे (१,८०० रुपये), ९० मिली क्षमतेच्या बनावट देशी मद्याचे २० बॉक्स (८०,००० रुपये), १० हजार रुपयांचा मोबाईल आणि इतर साहित्य (७५० रुपये) असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

रमेश पापय्या पुल्लम (४७, मूळ रा. सिद्धीपेट, तेलंगणा; सध्या रा. शेंबाळपिंपरी), प्रशांत सारय्या चेपयाला (२८, रा. शेंबाळपिंपरी) आणि शुभम प्रवीण जयस्वाल (३३, रा. अकोला बाजार, जि. यवतमाळ) अशी आरोपींची नावे आहे.

ही कारवाई आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपआयुक्त पराग नवलकर आणि अधीक्षक नितेश शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक अनिल पिकले, सुकेशनी शिंदे, पंजाब राठोड, महेंद्र रामटेके, वाघजी बोंबले,

### आरोग्यास घातक बनावट मद्य

■ जप्त केलेले बनावट मद्य आरोग्यास अत्यंत घातक असून, त्यामुळे नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असे विभागाने सांगितले. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे बनावट मद्य विक्रीच्या टोळींना चाप बसला असून, शासनाचा महसूल बुडवणाऱ्या आणि जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या घटनांवर कठोर कारवाई सुरू असल्याचे संकेत मिळाले आहेत.

# जिओ कर्मचाऱ्यांचा एल्गार, आंदोलन कायम ठेवण्याचा इशारा

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**महागाव :** जिओ टॉवरवरील 16 जिल्ह्यांतील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी जन आंदोल आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांच्या मध्यस्थीने प्रयत्न सुरू आहेत. याअनुषंगाने रिलायन्स जिओ कंपनीचे महाराष्ट्र प्रमुख रवी मोटवानी यांच्यासोबत तीन तास सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या, वेतनवाढ, कामाच्या अटी-शर्ती तसेच नोकरीच्या सुरक्षिततेबाबत सखोल चर्चा झाली. आंदोलनामुळे 16 जिल्ह्यांतील पाचशेहून अधिक कर्मचाऱ्यांचे कामकाज ठप्प झाले आहे. काही मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली असली तरी अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही. लवकरच समाधानकारक निर्णय होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली. न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवणार असल्याचे सतीश इंगळे यांनी सांगितले.

यावेळी गोविंद देशमुख, पंजाब पवार, मंचक खंदारे, आकाश चव्हाण, सचिन उबाळे, तानाजी सुरोशे व अतुल शिंदे उपस्थित होते.

# भीषण अपघातात; दुचाकीस्वार ठार

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**राळेगाव :** राष्ट्रीय महामार्गावर भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीस दिलेल्या जबर धडकेत ३० वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (ता.१२) रात्री पिंपळखुटी गावाजवळ घडली. आकाश दौलत किनाके (वय ३०, रा. रा.खैरगाव दे) असे मृत युवकाचे नाव आहे. आकाश हा तेलंगणातील पेंढरवाडा येथे जात असताना अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. अपघातात त्याच्या डोक्याला व तोंडाला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने पांढरकवडा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस तपास सुरू आहे.

# आर्णी तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई

## आ. राजू तोडसाम यांनी घेतला आढावा

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**आर्णी :** तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई दिवसेंदिवस भीषण होत चालली आहे. या समस्येवर मात करण्यासाठी आमदार प्रा. राजू तोडसाम यांच्या अध्यक्षतेखाली १६ फेब्रुवारी २०२६ रोजी महालक्ष्मी लॉन्स, आर्णी येथे विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत तात्काळ उपाययोजना राबवण्याचे ठोस निर्णय घेण्यात आले असून, अति टंचाईग्रस्त गावांना लवकरात लवकर दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बैठकीला आर्णी तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, महसूल अधिकारी, पंचायत समितीचे विभागप्रमुख, जल जीवन मिशनचे शाखा अभियंता, पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी, वीज वितरण कंपनीचे प्रतिनिधी तसेच इतर संबंधित अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तहसीलदार वैशाख वाहुरवाघ, गटविकास अधिकारी रमेश खरोडे यांच्यासह प्रिया तोडसाम, प्रकाश राठोड, मुबारक तवर, बिपिन राठोड, रमेश चव्हाण (सरपंच, केळझरा), रवी राठोड (सरपंच, किन्ही) आदी लोकप्रतिनिधींनीही सक्रिय सहभाग घेतला.

अति टंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे निर्देश आमदार राजू तोडसाम यांनी दिले. जल जीवन मिशन अंतर्गत अपूर्ण राहिलेल्या योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणा एकत्र येऊन काम करतील, असे ते म्हणाले. "अपूर्ण राहिलेल्या जल जीवन योजनांना प्राधान्य देऊन त्या तात्काळ पूर्ण करून घेण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करणार," असे आमदार तोडसाम यांनी सांगितले.

पाणीपुरवठा योजनांसाठी वीज कनेक्शन मिळण्यात येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. वीज वितरण कंपनीचे शाखा अभियंता क्षीरसागर यांना या समस्या त्वरित सोडवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

विविध उपाययोजनांचा मास्टर प्लॅन बैठकीत खालील उपाययोजना ठरवण्यात आल्या. टंचाईग्रस्त भागातील विहिरींचे अधिग्रहण करणे. विहिरींचे खोलीकरण करणे आणि आडवे-उभे बोर मारणे. हातपंप आणि इंधन विहिरींची उभारणी. पाणीटंचाई निवारणासाठी इतर तात्काळ उपाय राबवणे. सरपंच आणि लोकप्रतिनिधींनी या बैठकीत मांडलेल्या उपाययोजनांवर समाधान व्यक्त केले. "या निर्णयांमुळे गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल," अशी प्रतिक्रिया अनेक सरपंचांनी दिली. या आढावा बैठकीमुळे आर्णी तालुक्यातील पाणीटंचाईच्या समस्येवर लवकर तोडगा निघेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. स्थानिक प्रशासन आणि

# उमरखेड शहरात धुळीचा कहर; नागरिक हैराण

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**उमरखेड :** उमरखेड शहरात सध्या धुळीने थैमान घातले आहे. शहरातील रस्त्यांवरून वाहनांच्या धावण्याने सतत धुरळा उडतो. चौकात उभे राहिले तरी धुळीचे लोट दिसतात. गाडी गेल्यावर मागून उठणारा धूरळा थेट लोकांच्या नाकात-डोळ्यात जातो. यामुळे नागरिकांची दमछाक होत आहे. शाळकरी मुले-मुली, लहान मुले, वृद्ध, महिला, रस्त्याकडेला दुकाने लावणारे व्यापारी यांची विशेषतः वाईट अवस्था आहे. दिवसभर धूळ श्वासात जाण्याने सर्दी-खोकला, दमा, डोळ्यांची जळजळ असे त्रास वाढले आहेत.

नागरिक सांगतात की, रस्त्यावरील वाहतूक दिवसेंदिवस वाढत आहे, पण रस्ते ना झाडले जातात, ना सकाळी-संध्याकाळी पाणी फवारणी होते. त्यामुळे धूळ कमी होण्याचे नाव घेत नाही. शहरातील काही रस्त्यांचे काम सुरू आहे, पण ते कधी पूर्ण होणार, याची स्पष्टता नाही. शहर धुळमुक्त कधी होणार, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

**नागरिकांची प्रमुख मागणी आहे :** रोज रस्ते झाडावेत. सकाळी आणि संध्याकाळी रस्त्यावर पाणी फवारणी करावी. रस्त्यांच्या कामाची वेगवान प्रगती करावी आणि पूर्णत्वाची मुदत जाहीर करावी. शहरातील रस्ते नगर परिषदेकडे असल्याने त्यांची देखभाल आणि स्वच्छता नगर परिषदेने करावी, अशी अपेक्षा आहे. नागरिक वारंवार स्थानिक प्रतिनिधींमार्फत संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करत आहेत की, तात्काळ पावले उचलावीत. पाणी फवारणी आणि नियमित स्वच्छता केल्यास हा त्रास बऱ्यापैकी कमी होऊ शकतो. प्रशासनाने आता जागे होऊन तातडीने कारवाई करावी. अन्यथा नागरिकांमध्ये असंतोष वाढण्याची शक्यता आहे. शहरवासीय थेट प्रश्न विचारत आहेत : प्रशासन या समस्येवर

# शिदोरी संस्कारांची, उभारणी स्वराज्याची!

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**यवतमाळ :** राजमाता जिजाऊंनी शिवबाला केवळ तलवार चालवायला शिकवलं नाही, तर संतांच्या अभंगांतून 'माणुसकी' आणि वारकरी परंपरेतून 'विनम्रता' शिकवली. कितीही प्रगती झाली, तरी तुमची नाळ आपल्या शेती, माती, संस्कृतीशी जोडली असली पाहिजे. आजच्या पिढीने हा संदेश आत्मसात करणे आवश्यक आहे. कारण, संस्कारांशिवाय सामर्थ्य अपूर्ण आहे! शिवजयंती निमित्त प्रा. सोनल देशमुख यांनी मुलगा श्रीयान आणि त्याच्या सावंगड्यांना सोबत घेऊन वेशभूषेतून शिवकालीन संस्कृती दाखविण्याचा प्रयत्न केला.

# महिलेचा मृत्यू

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**पांढरकवडा :** केळापूर तालुक्यातील वृंदावन टाकळी येथे घरातील साफसफाई करत असताना साप चावल्याचा संशय असून 36 वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना 14 फेब्रु. रोजी सायंकाळी घडली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत महिला गीता सुनिल चट्टेकार वय 36, रा. वृंदावन टाकळी, अशी ओळख पटली आहे. गीताबाई यांना काहीतरी चावल्यामुळे चक्कर येत असून तब्येत बिघडल्याची माहिती त्याने दिली.

# कळंब बस स्थानकाचे काम संथगतीने

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**कळंब :** कळंब शहरातील नवीन बस स्थानकाचे बांधकाम गेल्या तीन वर्षांपासून सुरू असले तरी कामाची गती अत्यंत मंद असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) कडून सुरू असलेल्या या प्रकल्पाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

सध्या बस स्थानक परिसरातील काही भाग बांधकामासाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे नागपूर, वडकी, राळेगाव मार्गावरील बसेस स्थानकाच्या आत प्रवेश करीत असल्या तरी यवतमाळकडून येणाऱ्या व नागपूर-वडकी-राळेगाव मार्गाने जाणाऱ्या बसेस बस स्थानकाबाहेरील मुख्य रस्त्यावरच थांबविल्या जात आहेत. परिणामी प्रवाशांना जीव मुठीत धरून रस्त्यावर उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे.बस स्थानकासमोरील रस्ता अत्यंत वर्दळीचा असून याच मार्गावरून जड वाहनांची वाहतूक सातत्याने सुरू असते. राळेगाव, वडकी, जोड मोहा तसेच परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांची मोठी वर्दळ या रस्त्यावर असते. वर्धा, नागपूरकडे जाणारे अनेक प्रवासी याच ठिकाणी बस पकडतात. त्यामुळे प्रवाशांची मोठी गर्दी होत असून भविष्यात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कळंब येथे नवीन बस स्थानक उभारण्याचे काम सुमारे तीन वर्षांपूर्वी सुरू करण्यात आले. मात्र ठेकेदाराच्या संथ कार्यपद्धतीमुळे काम रखडल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. एसटी प्रशासन याबाबत गांभीर्याने पावले उचलत नसल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. "एखाद्या प्रवाशाचा जीव गेल्यास जबाबदार कोण?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन बांधकामाला गती द्यावी व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी तात्पुरती उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

# थाळेगाव जिल्हा परिषद शाळेत 'सीखें उत्सव'

## विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणारा उपक्रम; मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**यवतमाळ :** बाभुळगाव पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद शाळा थाळेगाव येथे नुकतेच 'सीखें' शैक्षणिक प्रदर्शन व शिष्यवृत्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी आयोजित या उपक्रमाला ग्रामस्थ व शिक्षकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच वैशाली दिघाडे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्याम बावनथडे होते. प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच दिनेश वानखेडे, केंद्रप्रमुख दत्तात्रय येंडे, उद्धव घोडे, पुरुषोत्तम सहारे, प्रकाश सांडे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष प्रियंका वाघमारे, 'सीखे'चे जिल्हा व्यवस्थापक संभाजी भिसे, सहायक जिल्हा व्यवस्थापक नितीन पखाले, ग्रामपंचायत अधिकारी राजूभाऊ जामणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळेच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले, तर मान्यवरांचे स्वागत 'ग्रंथ भेट' देऊन करण्यात आले. 'सीखें' प्रदर्शनीमध्ये विद्यार्थ्यांनी मराठी आणि गणित विषयातील कठीण संकल्पना सोप्या करून सांगणारे शैक्षणिक साहित्य मांडले होते. आपल्या ओघवत्या शैलीत सादरीकरण करून चिमुकल्यांनी उपस्थितांची मने जिंकली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साधला जात असल्याचे गौरवोद्गार उपसरपंच दिनेश वानखेडे यांनी काढले. बीआरसीचे प्रवीण घाडगे यांनी शिक्षकांना परीक्षेच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. नितीन पखाले यांनी 'सीखें' उपक्रमाच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख दत्तात्रय येंडे यांनी केले. संचालन सहायक शिक्षिका संपदा हिरोळे यांनी, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक चंद्रबोधी घायवटे यांनी केले. या प्रदर्शनाच्या यशासाठी सीखें

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी आर्णी यांचे न्यायालय आर्णी**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार शेख मोसीन शेख इरफान, रा. आर्णी, ता. आर्णी, जि. यवतमाळ यांचा जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) नुसार अर्जदार शेख मोसीन शेख इरफान यांच्या दिनांक १६/०१/२००२ रोजीच्या मौजा आर्णी येथील जन्माची नोंद नगर परिषद आणी येथील जन्म मृत्यु नोंदणी अभिलेखात करण्याकरीता आदेश मिळणेबाचतचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार शेख मोसीन शेख इरफान यांच्या दिनांक १६/०१/२००२ रोजीच्या मौजा आर्णी येथील जन्माची नोंद नगर परिषद आर्णी येथील जन्म-मृत्यु नोंदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत कुणाचा आक्षेप हरकती असल्यास जाहिरनामा प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन पंधरा दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किंवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुराव्याच्या दस्तऐवजासह कार्यालयीन वेळेत मादर करावा. (शासकिय सुट्टीचे दिवस सोडुन) याव्दारे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणासही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन सदर अर्जाची सुनावणी करण्यात येवून योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

स्वा./-
तहसिलदार, आर्णी

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी आर्णी यांचे न्यायालय आर्णी**

**जाहीरनामा**

ज्याअर्थी अर्जदार शेख मोसीन शेख इरफान, रा. आर्णी, ता. आर्णी, जि. यवतमाळ यांचा जन्म मृत्यु नोदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) नुसार अर्जदार शेख मोसीन शेख इरफान यांची बहीण गुलनाज शेख इरफान हिच्या दिनाक १९/१०/२००० रोजीच्या मौजा आर्णी येथील जन्माची नोंद नगर परिषद आर्णी येथील जन्म मृत्यु नोंदणी अभिलेखात करण्याकरीता आदेश मिळणेबाचतचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

करिता सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सदर अर्जानुसार गुलनाज शेख इरफान हिच्या दिनांक १९/१०/२००० रोजीच्या मौजा आर्णी येथील जन्माची नोंद नगर परिषद आर्णी येथील जन्म-मृत्यु नोदणी अभिलेखामध्ये घेण्याबाबत कुणाचा आक्षेप हरकती असल्यास जाहिरनामा प्रसिध्द केल्याच्या दिनाकापासुन पंधरा दिवसाचे आत या न्यायालयात हजर राहुन आपण किवा आपल्या वकीलामार्फत सर्व पुराव्याच्या दस्तऐवजासह कार्यालयीन वेळेत सादर करावा. (शासक्रिय सुट्टीचे दिवस सोडुन) याव्दारे असेही जाहीर करण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कोणतेही आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणासही काही सांगावयाचे नाही असे गृहित धरुन सदर अर्जाची सुनावणी करण्यात येवुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक: १०/०२/२०२६

शिक्का

स्वा./-
तहसिलदार, आर्णी

५ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# प्रवाशांची एकजूट, बांधणार वज्रमूठ


शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...

दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये ठेकेदाराची दादागिरी दररोज वाढत आहे. या ठेकेदारासोबत रेल्वे अधिकाऱ्यांची भागिदारी असल्यामुळे आपले कोणची काही करू शकत नसल्याने तो मग्रूर ठेकेदार प्रवाशाना अश्लिल भाषेत महिलांसमोरच शिवीगाळ करून मारहाणीची भाषा करतो, या सर्व प्रकाराला वाशीम शहरातील नागरिक त्रस्त झाले असून त्याच्यावर कारवाईची

सिटी न्यूज सुपरफास्ट
शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६

माणुसकीला रोजच हरताळ...

रेल्वे पार्कींग वाल्याची पोलीसांनाही शिवीगाळ!

अरेरावीची ठेकेदारी, म्हने कायद्यापेक्षाही भारी

●सिटी न्युज ब्युरो @वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहेत. पार्कींग मधील बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ

अशी कशी रेल्वेच्या पार्कींगची ठेकेदारी, रोजच दादागिरी अन् भाईगिरी...

माणुसकी नावाचा काही प्रकार असतो. चांगल्या बोलण्याने वागल्याने माणुस पैशाकडेही पाहत नाही रेल्वे स्टेशनच्या परिसरात गाडी आल्यापासुन मोठ्या आवाजात दादागिरीने बोलुन लोखंडी रॉड घेऊन मारण्याच्याच हेतुने ठेकेदार उभा असतो प्रेमाने काहीच बोलत नाही. घाण घाण शिवीगाळ करत गाडी पार्कींग करा. नाहीतर मारहाण करण्याच्या थेट धमक्या देतो.

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...

दादागिरी रोजच पुन्हा-पुन्हा, पोलिसांनीच दाखल केला गुन्हा !

काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण

मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...

दादागिरीची हद्द, ठेका करा रद्द !

रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी केली खुद्द

ठेकेदाराला काळ्या यादीत टाका - जुगलकिशोर कोठारी

वाशिम रेल्वे स्थानकावरील पार्किंग ठेका रद्द करा - सूरज चौधरी

## वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्या...

# ठेकेदाराची लूट, अधिकाऱ्यांची सूट !

## दादागिरीचा तिढा, ठेका रद्द करण्यासाठी उभारणार लढा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशनवर काहीच कारण नसतांना सिसीटीव्ही कॅमेरे असतांना पार्कींगचे पैसे देवूनही पार्किंगमध्ये ठेकेदाराची दादागिरी दररोज वाढत आहे. या ठेकेदारासोबत रेल्वे अधिकाऱ्यांची भागिदारी असल्यामुळे आपले कोणची काही करू शकत नसल्याने तो मग्रूर ठेकेदार प्रवाशाना अश्लिल भाषेत महिलांसमोरच शिवीगाळ करून मारहाणीची भाषा करतो, या सर्व प्रकाराला वाशीम शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्याच्या आरेरावीचा व दादागिरीचा पोलिसांना शिवीगाळ केल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला होता. या सर्व प्रकाराची सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी सिटी न्युज चॅनलने वृत्त लावून धरून पाठपुरावा केला. त्यामुळे पोलिसांनीच या मग्रूर ठेकेदाराविरूध्द गुन्हा दाखल केला असून हा ठेकेदार फरार आहे. तर या दादागिरी करणाऱ्या ठेकेदाराचा ठेका रद्द करा अशी मागणीच रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी रेल्वे अधिकाऱ्यांकडे केली आहे. आता त्रस्त प्रवाशी एकजुठ होत असून दादागिरीच्या विरोधात वज्रमुठ बांधली आहे. ठेका रद्द करण्यासाठी त्रस्त झालेले प्रवाशी नागरिकच लढा उभारणार आहेत.

माणुसकी नावाचा काही प्रकार असतो. चांगल्या बोलण्याने वागल्याने माणुस पैशाकडेही पाहत नाही रेल्वे स्टेशनच्या परिसरात गाडी आल्यापासुन मोठ्या आवाजात दादागिरीने बोलुन लोखंडी रॉड घेऊन मारण्याच्याच हेतुने ठेकेदार उभा असतो प्रेमाने काहीच बोलत नाही. घाण घाण शिवीगाळ करत गाडी पार्कींग करा. नाहीतर मारहाण करण्याच्या थेट धमक्या देतो. प्रवाशा सोबत बहुतांशी महिला व मुलीअसतात त्यांनाही न जुमानता मागील पुढील विचार न करता थेट अश्लिल शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देतो.अनेकांना रॉडने मारहानी केल्याच्या सुध्दा तक्रारी आहेत.प्रेमाने प्रवाशी भिकाऱ्याला व तृतीय पंथ्याला १० रुपयाऐवजी २० रुपये देतात. मात्र हा मगरुर ठेकेदार ६ रुपयाच्या पार्कींगसाठी प्रवाशांवर दादागिरी करतो. त्याला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची साथ असल्याची चर्चा आहे. वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहेत. पार्कींग मधील बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून या पार्कींग ठेकेदारावर गुन्हा दाखल झाला असून आता ठेका रद्द करावा अशी मागणी सर्व सत्तरातुन होत आहे.

वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला होत.पार्कींगची पावती नसल्याने बाईक घेण्यासाठी आलेल्या युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झालं होतं.त्यानंतर या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात होतं.तसेच या मुजोर पार्कींग ठेकेदारावर कठोर कारवाईची मागणी सर्व स्तरातून केली जात होती.

आता या व्हायरल व्हिडीओची पोलिसांकडून गंभीर दखल घेण्यात आली असून शिविगाळ करणाऱ्या ठेकेदारावर अखेर वाशीम शहर पोलिसात विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आहे.पोलीस या ठेकेदाराचा शोध घेत असून तो फरार झाल्याची माहिती आहे.



### ठेकेदाराला काळ्या यादीत टाका - जुगलकिशोर कोठारी

दादागिरी करून कारण नसतांना प्रवाशांना विनाकारण त्रास देत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे अशा दादागिरी करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून कठोर कारवाई करण्याची मागणी डीआरयूसीसीचे सदस्य, अखील भारतीय ग्राहक पंचायतचे अध्यक्ष, व्यापारी संघाचे माजी अध्यक्ष जुगलकिशोर कोठारी यांनी केली आहे. या पुर्वीही या मग्रूर ठेकेदाराच्या विरोधात ग्राहक पंचायतच्या वतीने, व्यापारी संघाच्या वतीने अनेक तक्रारी केल्या आहेत. नागरिकांनीही त्याच्या विरोधात तक्रारी करून गुन्हे दाखल केले आहेत.

### सिटी न्युज सुपरफास्टचा सततचा पाठपुरावा...

७ ते ८ वर्षापासून कारण नसतांना पार्कींगचे पैसे देवूनही विनाकारण महिलांसमोर अश्लिल शिवीगाळ करून दादागिरी करणाऱ्या मग्रुर ठेकेदाराला वाशीमचे नागरिक त्रस्त झाले होते. या संबंधिचे सर्वप्रथम सिटी न्युज सुपरफास्टने व आरआरसी न्युजने वृत्त प्रकाशित करून जनतेच्या भावनेला वाचा फोडली. त्यामुळे तीन दिवसापासून दररोज हजारो फोन सिटी न्युज सुपरफास्टला येत असून धन्यवाद देत आहेत. त्यामुळे जनतेच्या न्यायासाठी जनतेसोबत सिटी न्युज सुपरफास्ट कायम सोबत आहे आणि सोबत राहणार आहे.

### वाशिम रेल्वे स्थानकावरील पार्किंग ठेका रद्द करा -सूरज चौधरी

वाशिम रेल्वे स्थानकावरील पार्किंग ठेकेदाराकडून प्रवाशांशी गैरवर्तन, शिवीगाळ व अधिक दराने शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या प्रकारामुळे प्रवाशांना त्रास होत असून रेल्वे प्रशासनाची बदनामी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेच्या झेडआरयूसीसीचे सदस्य सुरज तुळशीराम चौधरी यांनी नांदेड विभागाच्या वाणिज्य व्यवस्थापकांकडे लेखी निवेदन देत संबंधित पार्किंग ठेक्याची तात्काळ चौकशी करून ठेका रद्द करण्याची मागणी केली आहे.

## थोडक्यात

### वाशिम येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर वाशिम तसेच सन्मती अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळावा शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

हा महारोजगार मेळावा सकाळी १० ते सायं. ४ वाजेपर्यंत सन्मती अभियांत्रिकी महाविद्यालय, सावरगाव बर्डे, मालेगाव रोड, वाशिम येथे होणार आहे. मेळाव्यात नामांकित कंपन्यांच्या वतीने प्रत्यक्ष (ऑन द स्पॉट) मुलाखती घेण्यात येणार असून पात्र उमेदवारांना त्वरित नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.यासोबतच रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन तसेच विविध महामंडळांच्या कर्ज योजनांची माहिती देण्यात येणार आहे. जिल्ह्यात यापूर्वी झालेल्या रोजगार मेळाव्यांमधून शेकडो युवक-युवतींना रोजगार मिळाला असून अनेकांनी स्वतःचा उद्योग सुरू केल्याचे सकारात्मक चित्र समोर आले आहे.राज्य शासनाच्या कौशल्य विकास उपक्रमांमुळे मोठ्या प्रमाणात युवकांना स्थिर रोजगार मिळत असल्याचेही दिसून येते.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवती, आयटीआय, पदवीधर, तांत्रिक शिक्षण घेतलेले उमेदवार तसेच स्वयंरोजगार इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहा आयुक्त प्रवीण खंडारे यांनी केले आहे

### डाक विभागाच्या वतीने पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

भारतीय डाक विभागातर्फे तरुणांसाठी युनिव्हर्सल पोस्टल युनियनच्या ५५ व्या आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ९ ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन डाक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

सदर स्पर्धेसाठी पत्रलेखनाचा विषय 'सध्याच्या डिजिटल जगात मानवी संबंध का महत्त्वाचे आहेत, याबाबत मित्राला लिहिलेले पत्र' असा आहे. सदर पत्र इंग्रजी किंवा संविधानाच्या ८ व्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही भाषेत लिहिता येणार आहे. ही स्पर्धा इच्छुक शाळांमध्ये शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी घेण्यात येणार असून, रविवार, दि. ८ मार्च २०२६ रोजी तर शालेय स्तरावर ७ मार्च रोजी स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र पोस्टल सर्कल (राज्यस्तर) पातळीवर निवड झालेल्या उत्कृष्ट पत्रांसाठी प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक १० हजार रुपये, तृतीय पारितोषिक ५ हजार रुपये, आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या पत्रांसाठी अनुक्रमे ५० हजार रुपये, २५ हजार रुपये, १० हजार रुपये इतकी रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. तरी अकोला डाक विभागातील जास्तीत जास्त विद्यार्थी व शाळांनी युनिव्हर्सल पोस्टल युनियनच्या ५५ व्या आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रवर डाक अधीक्षक रामा रेड्डी यांनी केले आहे.

# कारवाईत नको भेदभाव, कर्तव्यदक्ष म्हणून नाव !



* सामूहिक कॉपी परीक्षा केंद्रावर प्राथमिक शिक्षणाधिकारी ससाने यांची धडाकेबाज कारवाई
* कोचिंग क्लासेस मध्ये शिकणाऱ्या नवश्रीमंताच्या पाल्यांमध्ये खळबळ
* विद्यार्थ्यांकडून हजारो रूपये घेणाऱ्या संस्थानिकांसह दलालांचे देऊळ पाण्यात
* कॉपी सुरू असलेल्या केंद्रावरील बैठे पथक आणि पोलीसांवर सुद्धा फौजदारी कारवाई व्हावी
* प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने यांच्या प्रामाणिक कर्तव्याला सलाम.


मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम Express

कॉपीमुक्त अभियान नव्हे, कॉपीयुक्त अभियान !

*संस्थानिक, मुख्याध्यापक, केंद्रसंचालक, पर्यवेक्षक बैठेपथक आणि पोलिसांच्या संगनमताने परीक्षा केंद्रावर गैरप्रकार

*वाशीम जिल्ह्यात बारावीच्या परीक्षा केंद्रावर कॉपीमुक्त अभियानाचा फज्जा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील भ्रष्ट कारभारामुळे आधीच राज्यभरात बदनाम झालेला आहे. या भ्रष्टांच्या विरोधामध्ये वाशीम जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने यांनी सोमवारी १६ फेब्रुवारी रोजी बारावीच्या भौतिकशास्त्राच्या पेपरच्या दिवशी वाशीम तालुक्यातील जुमडा-टो परीक्षा केंद्रावर धाड टाकली.या धाडीत चक्क संपूर्ण परीक्षा केंद्रावरील सर्व विद्यार्थी सामूहिक कॉपी करताना आढळून आलेत. या धाडीने कथित संस्थानिक आणि त्यांच्या पापात सहभागी असलेल्या शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांमध्ये ससाने साहेबांची 'धडकी' भरल्याची जिल्हाभरात चर्चा आहे. ससाने साहेबांच्या प्रामाणिक कार्याचे विविध स्तरातून अभिनंदन केल्या जात आहे.एकट्या ससाने साहेबांच्या हातामध्ये बारावी आणि दहावी च्या भरारी पथकाची धुरा सोपविल्यास वाशीम जिल्ह्यातील सामूहिक कॉपीसाठी प्रसिद्ध असलेले कथित परीक्षा केंद्र कायमस्वरूपी बंद होतील अशीही जाणकारांमध्ये चर्चा आहे.

राज्यशासनाने या वर्षीपासून राज्यात कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.या अभियानाच्या यशस्वीतेसाठी शासनाने शिक्षण विभागाला सर्व परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध ठेवण्यासाठी बंधन घातले आहे.परंतु, माध्यमिक शिक्षण विभागातील भ्रष्टांना चिरीमिरी देवून संस्थानिकांच्या बोटावर नाचणाऱ्या मुख्याध्यापक, प्राचार्यांनी परीक्षा केंद्र असलेल्या शाळा,उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये परीक्षा काळात आवश्यक असलेल्या सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असल्याचे खोटे हमीपत्र,बंधपत्र सादर केल्याचीही चर्चा आहे.

भ्रष्टाचाराचे कर्दनकाळ म्हणून ख्याती असलेल्या वाशीम जि.प.चे कर्तव्यदक्ष प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने यांनी सोमवारी जुमडा-टो येथील मैनागिरी विद्यालयात विज्ञान शाखेच्या भौतिकशास्त्राच्या पेपरच्या दिवशी धाड टाकली असता 'त्या' परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना परीक्षा काळात आवश्यक असलेल्या भौतिक सुविधाच उपलब्ध नसल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे. वाशीम जिल्ह्यात विद्यमान शिक्षक आमदार,रिसोडचे आमदार, माजी मंत्री,माजी खासदार, विधान परिषद सदस्य ,माजी आमदार,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष,बाजार समितीचे आजी,माजी सभापती आणि त्यांच्या चेलेचपाट्यांच्या शिक्षण संस्था आहेत.तसेच काही शिक्षक संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी यांच्या शाळा आहेत. या सर्व स्वयंघोषित समाजसेवकांनी संगनमत करून शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राचे बाजारीकरण केले आहे.या बाजारीकरणाला शिक्षण विभागातील आजी-माजी शिक्षणाधिकाऱ्यांनी पाठींबा देवून कोट्यवधीची अपसंपदा जमा केली आहे.ही बाब सूर्यप्रकाशासारखी सत्य आहे. शिक्षण विभागातील काही कथित अधिकाऱ्यांनी पैशाच्या लोभापायी राजाश्रय असलेल्या संस्थानिकांच्या पापात सहभागी होवून शिक्षण क्षेत्राला बदनाम केले असल्याचीही जाणकारांमध्ये चर्चा आहे.

परीक्षा केंद्रावर परीक्षा काळात शासनाने बैठे पथक नियुक्त केले आहे.या पथकात गावातील तलाठी,पोलीस पाटील, सरपंच,प्रतिष्ठीत व्यक्ती ,शिक्षक प्रतिनिधी यांचा समावेश केला आहे.तसेच परीक्षा काळात चोख बंदोबस्त ठेवण्यासाठी पोलीस कर्मचारी,होमगार्ड यांनाही नेमण्यात येते. ज्या परीक्षा केंद्रावर कॉपी,सामूहिक कॉपी आढळली त्या परीक्षा केंद्रावरील बैठे पथकातील सर्व दोषी,आणि पोलीस कर्मचारी,होमगार्ड यांचेवरही फौजदारी कारवाई करण्याची मागणी शिक्षणप्रेमी नागरिकांकडून केल्या जात आहे.

जिल्ह्यातील ईयत्ता बारावीच्या ज्या परीक्षा केंद्रावर भौतिक सुविधा उपलब्ध नाहीत.तसेच विभागीय परीक्षा मंडळाला व माध्यमिक शिक्षण विभागाला ज्या शाळेच्या मुख्याध्यापक, प्राचार्यांनी खोटी माहिती दिली अशा सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करुन त्यांना निलंबित करण्याची मागणीही विविध स्तरातुन होत आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकीचा बिगुल वाजला !

## २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेला सुरुवात, पहा संपूर्ण वेळापत्रक...

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ या काळात संपत आहे, तसेच ज्या नवीन ग्रामपंचायती स्थापन झाल्या आहेत, त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग (वॉर्ड) रचनेचा अधिकृत कार्यक्रम राज्य शासनाने जाहीर केला आहे. त्यानुसार येत्या २० फेब्रुवारीपासून प्रभाग रचनेचे काम सुरु होणार असून ग्रामपंचायतींची प्रारुप प्रभाग रचना दि.७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिध्द केली जाणार आहे.

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर शासनाने प्रशासक नेमण्याचा निर्णय घेतला होता. मात्र,आता मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा बिगुल वाजला असून वार्ड (प्रभाग) रचनेचा अधिकृत कार्यक्रम शासनाने जाहीर केला आहे.




### प्रभाग रचनेची प्रक्रिया तीन टप्प्यात –

ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या प्रारुप प्रभाग रचनेच्या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे. प्रभाग रचनेची प्रक्रिया तीन टप्प्यात पार पडणार असून, त्याची संपूर्ण जबाबदारी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्यावर सोपवण्यात आली आहे. तहसीलदार गुगल अर्थच्या मदतीने २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत गावांचे नकाशे अंतिम करतील. तलाठी आणि ग्रामसेवक २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रत्यक्ष पाहणी करून प्रभाग निश्चित करतील. जिल्हाधिकाऱ्यांकडून संक्षिप्त तपासणी झाल्यानंतर २३ मार्च २०२६ पर्यंत राज्य निवडणूक आयोग या प्रस्तावाला मान्यता देईल, असे ग्रामविकास विभागाने म्हटले आहे. याबाबतचे आदेश ग्रामविकास विभागच्या सह सचिव वर्षा भरोसे यांनी जारी केले आहेत.

### अंतिम प्रभाग रचना होणार ४ मे रोजी प्रसिध्द -

ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेबाबत हरकती मागवण्यासाठी ७ एप्रिल २०२६ रोजी जाहीर सूचना प्रसिद्ध केली जाईल. नागरिकांना आपल्या हरकती १३ एप्रिल २०२६ पर्यंत नोंदवता येतील.प्राप्त हरकतींवर २१ एप्रिल २०२६ पर्यंत उपविभागीय अधिकारी सुनावणी घेतील. जिल्हाधिकारी सर्व प्रस्तावांची पडताळणी करून २८ एप्रिल २०२६ पर्यंत प्रभाग रचना अंतिम करतील आणि ती राज्य निवडणूक आयोगाला सादर केली जाईल. तर दि.४ मे २०२६ रोजी अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी प्रसिध्द करणार आहे.

# राज्यातील पहिलाच प्रयोग, शाहीरी प्रशिक्षणाचा योग !

## वाशीम येथे दहा दिवस प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबईद्वारा आयोजित दहा दिवसीय शाहिरी प्रशिक्षण शिबिरास सोमवार १५ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या हस्ते विधिवत उद्घाटन करून प्रारंभ करण्यात आला. शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालयाच्या वतीने राबविण्यात येणारा शाहिरी प्रशिक्षणाचा हा राज्यातील पहिलाच उपक्रम आहे.

शिबिराचे संचालक संतोष श्रीपत खडसे यांच्या मार्गदर्शनात गोपाळराव आटोटे यांच्या अध्यक्षतेखाली नगर परिषद बांधकाम सभापती राहुल तुपसांडे यांच्या हस्ते प्रयोगसिद्ध लोककलांच्या शाहिरी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नगरसेवक गणेश खंडाळकर, न.प.चे माजी उपाध्यक्ष माधवराव अंभोरे, जालनाचे शाहीर नानाभाऊ परिहार, शेषराव मेश्राम दादाराव गायकवाड, बीजेएस जिल्हा समन्वयक शिखरचंद बागरेचा आदी मान्यवरांची



प्रमुख उपस्थिती होती.

नगरपरिषदेचे बांधकाम सभापती राहुल तुपसांडे यांनी उद्घाटन भाषणातून शिबिरासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे तसेच लोककलावंताच्या समिती नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता तसेच विविध घटकांना समान संधी देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. गोपाळराव आटोटे यांनी अध्यक्ष भाषणातून महाराष्ट्रातील शाहिरांची चळवळ आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील शाहिरांच्या योगदानावर प्रकाश टाकला. माधवराव अंभोरे यांनी आपल्या भाषणातून शाहिरी या लोककलेचे महत्त्व आणि आवश्यकता पटवून दिली. यानंतर नानाभाऊ परिहार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शाहिरी पद्धतीने स्वागत गीत सादर केले .

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# पर्यटन व्यावसायिकांना संपूर्ण सहकार्य करू : जिल्हाधिकारी वर्षा मीना

**♦ नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवात 'इन्व्हेस्टर्स मीट'; गुंतवणूकदारांचा मोठा प्रतिसाद**

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी





**अकोला :** नरनाळा किल्ला व परिसर येथे पर्यटन विकासाच्या अनेक शक्यता असून, गुंतवणूक वृद्धीसाठी जिल्हा प्रशासनाकडून प्रयत्न होत आहेत. येथील ऐतिहासिक वारसा, समृद्ध निसर्ग यामुळे हे पर्यटन नकाशावरील महत्त्वाचे 'डेस्टिनेशन' ठरणार आहे. येथे व्यवसाय उभारण्यासाठी पर्यटन व्यावसायिकांनी पुढे यावे. शासन–प्रशासनातर्फ त्यांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले.

नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवात 'इन्व्हेस्टर्स मीट' मेळघाट टायगर रिट्रीट येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाली त्यावेळी त्या बोलत होत्या. माजी आमदार संजय गावंडे, उपवनसंरक्षक राहुलसिंह टोलिया यांच्यासह जिल्हा तसेच जिल्ह्या बाहेरील व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी मीना म्हणाल्या, नरनाळा किल्ला, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, धरण व पर्यटकांसाठी आकर्षण ठरतील अशी अनेक महत्वाची स्थळे या परिसरात आहेत. येथे इको रिसॉर्ट, इको स्टे, निसर्ग आधारित उपक्रम, कृषी पर्यटन, बोटिंग असे अनेक व्यवसाय निर्माण होऊ शकतात. स्थानिकांसाठी पूरक व्यवसायांची व रोजगाराची संधीही निर्माण होणार आहे. येथील संस्कृती, ऐतिहासिक वैभव, वनसंपदा यांचे जतन करून व सर्व वन कायदे, नियमांचे पालन करूनच पर्यटन विकास होणार आहे. येथे गुंतवणूक वाढून स्थानिकांना पूरक व्यवसाय व रोजगार मिळवून देण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. येथील गुंतवणूक भविष्यासाठी फायदेशीर ठरणार असून, स्थानिक विकास साधण्यास मदत होणार आहे. व्यवसायाच्या दृष्टीने आवश्यक परवानग्या आदींसाठी प्रशासनाकडून संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी अनेक व्यावसायिकांनी गुंतवणुकीची तयारी दर्शवली. इच्छुक स्थानिक व्यावसायिक, बाहेरून आलेले गुंतवणूकदार यांच्यातही व्यावसायिक भागीदारी, व्यवसाय वाढीच्या शक्यता याबाबत चर्चा झाली. हा विषय पूर्णत्वास जाण्यासाठी दर महिन्याला बैठक घेऊन पाठपुरावा करण्यात येणार आहे. या परिसरात प्रथमच अशी बैठक घेण्यात आली त्याबाबत सर्व गुंतवणूकदारांनी प्रशासनाचे आभार मानले.

# पातुर तलाव कालव्याची दुरुस्ती अभावी शेकडो हेक्टर जमिन सिंचनापासून वंचित



प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**पातुर :** पातुर तलाव शंभर टक्के भरला आहे.परंतु कालवा दुरुस्त न केल्यामुळे अडीचशे हेक्टर शेती सिंचनापासून वंचित आहे. या तलावामुळे आसपासच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळणे अपेक्षित होते, परंतु कालव्याच्या दुरुस्तीच्या अभावामुळे शेतकऱ्यांना निराशा झाली आहे.

पातुर तलाव हा सद्यस्थितीमध्ये ९०३ पाण्याने भरलेला असून या तलावाच्या कालव्याच्या दुरुस्ती अभावी २५० हेक्टर वरीलत् शेतकऱ्यांची निराशा झाली सन २०२४ २५ च्या कालवा दुरुस्तीकरिता नाम फाउंडेशन ने काम केल्याची कळते परंतु या फाउंडेशनने योग्य प्रकारे कालव्याची दुरुस्ती न केल्यामुळे या कालव्याचे पाणी बोडखा पर्यंत पोचले नाही. दरवर्षी कालव्याच्या दुरुस्तीखाली लाखो रुपयांच्या अपहार होत असून या गंभीर विषयाकडे वरिष्ठ अधिकाऱ्याने लक्ष देण्याचे गरजेचे आहे याबाबत या परिसरातील शेतकऱ्यांनी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, श्री नितीन देशमुख आमदार बाळापुर मतदार संघ, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला पातुर तहसीलदार अध्यक्ष पातुर तलाव पाणी वापर संस्था यांच्याकडे किशोर काळपांडे,सै. अमिर सै. रहुफ,सै. बाबु सै. रहमान,शेख वाजिद कंटोलवाल,शेख लुकमान,म. गाझी म. हमिद, सै. फज्जु,शेख हबिब,सै. इनुस सै. खाजा सै. अकबर शेख सत्तार,शेख हुशेन,शेख रहिम,शेख अनिस,नझीर खान शेख तौसिफ,शेख आसीफ सै. मुजमील,अलियाल खान तक्रार दाखल केली असून योग्य न्याय न मिळाल्यास शेतकरी यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे

# भीषण अपघातात एक ठार, एक गंभीर जखमी

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**हिवरखेड:** मंगळवारी रात्री कार आणि दुचाकी मध्ये झालेल्या भीषण अपघातात एक युवक उपचारा दरम्यान मरण पावला तर त्याच्या सोबत असलेल्या मुलावर अकोला येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्रमोद परशराम राऊत यांनी हिवरखेड पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला की ते वरखेड येथील रहिवासी आहे. त्यांच्या शेजारी त्यांचे भाऊ मोहन राऊत राहतात. त्यांच्याजवळ स्प्लेंडर प्रो मोटारसायकल क्रमांक एमएच ३० बी एल ७१०१ आहे. तळेगाव येथे सोमेश्वर यात्रा यात्रा असल्याने १७ फेब्रुवारी रोजी रात्री अंदाजे आठ वाजताच्या सुमारास फिर्यादी प्रमोद राऊत यांचा भाऊ मोहन परशराम राऊत, त्यांचा मुलगा सोहम मोहन राऊत १५, हर्षल प्रमोद राऊत १७ हे तिघे स्प्लेंडर मोटारसायकलने तळेगाव यात्रेत दर्शनासाठी जात असताना रात्री साडे आठ वाजताच्या सुमारास रामकृष्ण दातीर त्यांच्या घरी आले आणि त्यांनी सांगितले की तेल्हारा रोडवर रेल्वे स्टेशनचे काम सुरू असलेल्या ठिकाणी तुमच्या मुलाचा व पत्नीचा अपघात झाला. त्यावेळी फिर्यादी व मोहन ढगे तात्काळ घटनास्थळी पोहोचले. तेथे गर्दी दिसली. त्यावेळी मोहन राऊत यांनी सांगितले की मी गाडी थांबवून लघवीसाठी गेलो असता हर्षल व सोहम हे दोघे भाऊ मोटारसायकल जवळ उभे होते. त्याचवेळी तेल्हारा रोडने वरखेडकडे येणाऱ्या हुंडाई कंपनीचे चार चाकी वाहन क्रमांक एम एच ०१ बी.बी. १८७८ च्या चालकाने हर्षल व सोहम यांना धडक देऊन गंभीर जखमी केले. फिर्यादींनी लोकांच्या मदतीने हर्षल आणि सोहम यांना एम्बुलन्स मध्ये टाकून अकोला येथे उपचाराकरिता नेले असता डॉक्टरांनी हर्षल याला मृत घोषित केले. तर सोहम हा गंभीर जखमी असून त्याचा उपचार सुरू असून तो आय.सी. यु. मध्ये भरती आहे.

कारचालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून सोहम याला गंभीर जखमी होण्यास कारणीभूत असल्याने त्यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी. फिर्यादीवरून हिवरखेड पोलिसांनी अपघात ग्रस्त दुचाकी व कार हि दोन्ही वाहने पोलीस स्टेशनला जप्त केली असून पुढील तपास ठाणेदार गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरखेड पोलीस करीत आहेत.

# शहरातील सिग्नल नादुरूस्त, वाहतूक व्यवस्था विस्कळीत



प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील वाहतूक व्यवस्थित राहण्यासाठी सिग्नल शिवाय दुसरा मार्ग नाही. अन्यथा वाहने मनमर्जीने धावतात. कसलाही पायबंद राहत नाही. काही दिवसांपासून शहरातील सिग्नल बंद राहतात. मध्यंतरी वाशीम बायपास चौकातील सिग्नल दुरूस्ती झाली. तर मंगळवारी महाराजा अग्रसेन चौकातील सिग्नल बंद होते. त्यामुळे वाहने मनाला वाटेल तशी धावत होती.

शहर वाहतूक सुरळीत राहायची असल्यास चौकाचौकातील सिग्नल सुरळीत सुरू राहणे आवश्यक आहे. तांत्रिक बिघाडामुळे काही चौकात सिग्नल बंद राहतात अशी माहिती आहे.

# पालकमंत्र्यांच्या जिल्ह्यातच बांधकाम कामगार योजनेत गंभीर तफावत

**मूर्तिजापूर नगर परिषदेतील अनागोंदी कारभार उघड**

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर :** कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या जिल्ह्यातच शासनाच्या बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेत मोठ्या प्रमाणावर तफावत आणि गैरप्रकार सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

विशेषतः नगर परिषदेच्या कारभारावर अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. शासन नियमांनुसार ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांच्या अर्जावर ग्रामसेवकाची सही व शिक्का अनिवार्य असताना, मूर्तिजापूर तालुक्यातील अनेक ग्रामीण कामगारांच्या अर्जांवर अनधिकृतरीत्या नगर परिषदेच्या वतीने सही-शिक्के लावले जात असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. हे नियमबाह्य असून यामागे एजंटांची साखळी कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, मूर्तिजापूर नगर परिषदेच्या वतीने दिलेल्या दाखल्यांनुसार सरसकट बांधकाम कामगार असल्याचे दाखवण्यात येत आहे.

प्रत्यक्षात नियमित व्यवसाय, दुकानदार, इतर कामधंदे करणाऱ्यांनाही एजंटांच्या माध्यमातून बांधकाम कामगार म्हणून नोंदणी करून दिली जात असल्याचे आरोप आहेत.

या योजनेच्या नावाखाली एजंट मज्रांकडून कडून अर्ज नोंदणीसाठी १५०० ते २००० रुपये, किट, लाभ मिळवून देण्याच्या आमिषाने अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याच्या तक्रारी मजुरांकडून सातत्याने समोर येत आहेत. दुर्दैवाची बाब म्हणजे, नगर परिषद किंवा कामगार विभागाचा कोणताही अधिकारी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित नसतो, त्यामुळे एजंटांची मनमानी सुरू आहे.

**प्रशासनाची बघ्याची भूमिका?**

या सर्व प्रकारांमुळे खऱ्या गरजू बांधकाम कामगारांवर अन्याय होत असल्याचे दिसत आहे.

योजनेची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. तक्रारी होऊनही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. स्वतःच्या जिल्ह्यातच इतक्या मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार सुरू असताना, पालकमंत्री आकाश फुंडकर एजंटांची दुकानदारी थांबवण्यासाठी पुढाकार केव्हा घेणार...?

दोषी अधिकारी, कर्मचारी व एजंटांवर कारवाई होणार का..?, नियमबाह्य दिलेले दाखले रद्द होणार का..? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. जर वेळीच कठोर कारवाई झाली नाही, तर ही योजना दलालांच्या हाती जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

# घुसर येथे गॅरेजला भीषण आग



प्रतिनिधी १८ फेब्रुवारी

**अकोला :** शहराजवळील घुसर नजीक आदिकेश मुळे यांच्या दुचाकी दुरूस्तीच्या गॅरेजला काल रात्री साडेबाराच्या सुमारास अचानक आग लागल्याने गॅरेज मधील संपूर्ण साहित्य जळून खाक झाले. गॅरेज मालकाचे मोठे नुकसान झाले आहे. ही आग शॉर्ट सर्किट मुळे लागल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाने घटनास्थळ गाठत आग आटोक्यात आणली. तपास अकोट फाईल पोलिस करीत आहेत.

# कृषी उत्पन्न बाजार समितीत हरभऱ्याची आवक वाढली

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**अकोला :** कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये सध्या हरभ-याची आवक वाढली आहे. दररोज २००० ते ३००० कट्टे हरभरा येत आहे. त्यामुळे बाजार समिती च्या आवारात कट्टे मोठ्या प्रमाणात लागलेले दिसतात.

बाजार समिती मध्ये जेके वाणाला ५१०० ते ५३०० रुपये व विजयासाठी ५३०० ते ५५०० रुपये इतका भाव मिळतआहे. सद्यस्थितीत हरभरा ओला असल्याने भावात चढ-उतार होत आहे अशी माहिती बाजार समिती मधील सूत्रांनी दिली. परंतु भविष्यात आवक आणि हरभ-याचे भाव वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये 19 व 20 फेब्रुवारी रोजी विशेष कँपचे आयोजन

**♦ कोणत्याही व्याधीपासून काही मिनिटांत सुटका**

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**अकोला :** आजच्या गतिमान युगात प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या व्याधीने त्रस्त आहे. महागडी औषधे घेऊनही अनेक रुग्णांना आराम मिळत नाही. स्नायू, सांधे, गुडघे, कंबरदुखी इत्यादी त्रासाने त्रस्त असलेल्या रुग्णांना तात्काळ आराम मिळवून देण्यासाठी, शहरातील 'कमाल वेदना निवारण केंद्र' मध्ये १९ आणि २० फेब्रुवारी रोजी आयोजित कँपचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. नेचरोपॅथी, एक्युथेरपी आणि कायरोप्रॅक्टिक उपचार पद्धतीनंतर कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये फक्त पंधरा ते वीस मिनिटांत वेदनेतून आराम मिळतो, असा दावा आग्रा येथील सुप्रसिद्ध बी.ई.एम.एस. नेचरोपॅथी व कायरोप्रॅक्टिक तज्ज्ञ डॉक्टर तरुण यादव आणि थेरपिस्ट डॉ. उदेन खान यांनी केला आहे.

गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी, मणक्याच्या हाडामध्ये गॅपमुळे होणारी वेदना, हात-पायांना मुंग्या येणे, पायात पेटके येणे, मायग्रेनचा त्रास, छातीत दुखणे, पायांची जळजळ, अंगदुखी, मणक्याच्या हाडात गॅप, हात उचलता न येणे, हातामध्ये पेटके येणे किंवा शरीरात कोठेही वेदना असल्यास, या सर्व जुन्या दुखण्यांपासून मुक्ती मिळते. डॉ. तरुण यादव यांच्या मदतीने येथे एक ते दहा वर्षांपर्यंतच्या जुन्या वेदनेपासून केवळ १५ ते २० मिनिटांत पूर्णपणे आराम मिळू शकतो. आतापर्यंत डॉ. तरुण यादव यांनी शेकडो रुग्णांवर उपचार करून त्यांना रोगमुक्त केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक मोठे राजकारणी, उद्योगपती आणि सामाजिक संघटनांनी त्यांचा सत्कार केला आहे. १९ आणि २० फेब्रुवारी रोजी आयोजित कँपचा लाभ घेण्याचे आवाहन रुग्णांना करण्यात आले आहे.



महिलांसाठी येथे स्वतंत्र व्यवस्था आहे आणि ऑनलाईन नोंदणीची सोय देखील उपलब्ध आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कृपया खालील मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा: मोबाईल क्रमांक: ८६२३८८८४४३ तसेच ९०४९८३१५७३

# धरणात बुडालेल्या युवकाचा मृतदेह संत गाडगेबाबा आपात्कालीन शोध पथकाने दहा मिनिटात बाहेर काढला

प्रतिनिधी १८ फेब्रुवारी



**अकोला :** दगड पारवा धरणात बुडालेल्या युवकाचा मृतदेह संत गाडगेबाबा आपात्कालीन शोध व बचाव पथकाने दहा मिनिटांत बाहेर काढला.

बार्शिटाकळी पोलिसांना त्याच्या नातेवाईकांकडून मिळालेल्या माहितीनुसार १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी दगड पारवा धरणाच्या भिंतीवर मोबाईल, चप्पल दिसून आली. या शंकेवरुन बार्शीटाकळीचे पोलिस निरीक्षक प्रवीण धुमाळ यांनी पिंजरच्या संत गाडगेबाबा आपात्कालीन शोध व बचाव पथकाचे प्रमुख जीवन-रक्षक दीपक सदाफळे यांना माहिती दिली. सदाफळे यांनी त्यांचे सहकारी विष्णु केवट, अश्विन केवट, शेखर केवट, जितेंद्र केवट, अर्जुन केवट, राहुल सहानी यांना शोध व बचाव साहित्यासह घटनास्थळी पाठविले. पाहणी केली असता गेटच्या मध्यभागी २० ते २५ फुट खोल पाणी होते. सर्च ऑपरेशन चालु केले असता अवघ्या १० मिनिटातच धरणातील मृतदेह शोधून बाहेर काढून रात्री ८:४७ वाजता पोलिसांच्या ताब्यात दिला. मृतक युवक सुरेश भिमराव घुगे (२९) रा.दगड पारवा ता.बार्शीटाकळी येथील असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावर पीआय प्रविण धुमाळ, एएसआय विलास नाफडे, हे.कॉ. रविंद्र देशमुख, हे.कॉ. मंगेश महाजन, पो.कॉ.मनीष घुगे, सचिन सोळंके, आशिष तायडे, पोलिस पाटील, सरपंच, गावातील नागरिक व नातेवाईक हजर होते.


**CLASSIFIED**

**भाड्याने देणे आहे**
२५X६० चा हॉल व अट्याच दोन वॉशप आहे
पत्ता : गिरीनगर आप्पा दुध डेअरी जवळ, जुना RTO ऑफीस रोड, अकोला (आप्पा दुध डेअरीच्या बाजूला)
मो. 9922670850 9309379112

**फ्लैट फ्लैट फ्लैट**
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लैट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लैट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलोनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250 8788432278

**प्लाट प्लाट प्लाट**
नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लाट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606 7757905649


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK